# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

**सभा क्र. २७ // स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त // दिनांक : १०/०१/२०२०**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि.**१०/०१/२०२० शुक्रवार** रोजी सकाळी ११.०० वाजता जळगांव शहर महानगरपालिकेच्या सरदार वल्लभभाई पटेल टॉवर प्रशासकीय इमारतीमधील २ ऱ्या मजल्यावरील सभागृहात स्थायी समिती सभापती ॲड. हाडा शुचिता अतुलसिंह यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी रजिष्टरमध्ये स्वाक्षरी करुन खालील मा.सदस्य सभेस उपस्थित होते.

**मा.ॲड. हाडा शुचिता अतुलसिंह सभापती तथा पिठासीन अधिकारी**

| | |
|---|---|
| श्री.ढेकळे सदाशिव गणपत | सौ.देशमुख प्रतिभा गजानन |
| श्री. खडके सुनिल वामनराव | सौ.काळे रेश्मा कुंदन |
| श्री. कोल्हे प्रविण रामदास | श्री.लढढा नितीन बालमुकुंद |
| श्री. सोनवणे मुकुंदा भागवत | श्री.भंगाळे विष्णु रामदास |
| श्री. दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | श्री.बरडे नितीन मनोहर |
| श्री. पाटील राजेंद्र झिपरु | शेख सैईदा युसुफ |

सदर सभेस मा.आयुक्त श्री. उदय टेकाळे, उपायुक्त. श्री. अजित मुठे, मुख्यलेखापरिक्षक .श्री. संतोष वाहुळे, मुख्यलेखाधिकारी, कपील पवार, शहर अभियंता श्री.सुनिल भोळे व नगरसचिव श्री.सुनिल गोराणे उपस्थित होते.

**नगरसचिव :-** आजच्या सभेकरीता सन्मा.सदस्य श्री.सनकत चेतन गणेश यांचा रजेचा अर्ज आलेला असुन तो सभापती महोदय यांनी मंजूर केलेला आहे .

**वंदे मातरमने सभेची सुरुवात झाली.**

**नगरसचिव :-** मा.राज्य निवडणुक आयोग महाराष्ट्र यांचेकडील दि.०४ जानेवारी २०२० चे पत्र प्राप्त झालेले असुन महानगरपालिका पोट निवडणुक फेब्रुवारी २०२० कार्यक्रम जळगांव शहर महानगरपालिका, प्रभाग क्र.१९ अ ची आचार संहिता आणि निवडणुक कार्यक्रमाचे पत्र प्राप्त झालेल आहे. सदर निवडणुकीची आचार संहिता दि.०४ जानेवारी २०२० पासुन लागु झालेली असुन ती निवडणुकीचा निकाल जाहिर होई पर्यंत अंमलात राहील. वरील आचार संहिता निवडणुक होणाऱ्या संबंधीत प्रभागात लागु राहिल.मात्र या प्रभागातील मतदारावर विपरीत प्रभाव टाकणारी कोण्तीही कृती, घोषणा कोणत्याही मंत्री, खासदार, आमदार, नगरसेवक किंवा इतर पदाधिकाऱ्यांना इतरत्र सुध्दा करता येणार नाही. असे सदर आदेशात नमुद केलेले आहे. सदर पत्र सन्मा.सभागृहापुढे सादर केलेल आहे.

**मा.सभापती :-** आदर्श आचार संहितेनुसार आपण अजेंडयाच्या विषयावर चर्चा करणार आहोत. जो पर्यंत आचारसंहिता आहे आपण इतर कोणत्याही विषयावर चर्चा करणे टाळु या.

**श्री.नितीन लढढा :-** ताई आपण बरोबर बोलले, पण आचारसंहिता फक्त त्या प्रभागासाठी आहे. त्या प्रभागा व्यतिरिक्त चर्चा करणेस काही हरकत नाही. प्रभाग १९ अ मधील ज्या समस्या आहे अडचणी आहे काही विकास कामे असतील ते टाळुन उर्वरीत शहराच्या बाबतीत ज्या समस्या आहे. त्याच्यावरती चर्चा करणेस काही हरकत नाही मला असे वाटत आहे.

**मा.सभापती :-** नितीन भाऊ याच्यातुन सुध्दा आचारसंहितेचा भंग होऊ नये याची आपल्याला दक्षता घ्यावयाची आहे.

**श्री.नितीन लढढा :-** निश्चितपणे दक्षता घेऊ.

**मा.सभापती :-** ही आपली जबाबदारी आहे.

**नगरसचिव** :- मा.सहसचिव, राज्य निवडणुक आयोग महाराष्ट्र यांचे दि.१२ जुन २०१९ रोजी**चे** पत्र प्राप्त झालेले असुन त्या अनुषंगाने दि.२६ जानेवारी २०२० ते १० फेब्रुवारी २०२० या कालावधी लोकशाही पंधवाडा साजरा करणेबाबत सदर पत्रात निर्देश दिलेले आहे. त्या अनुषंगाने पंधवाडयामध्ये जागरुक मतदार लोकशाहीचा आधार हा विषय आधार माणुन लोक जागृती संदर्भात कार्यवाही करणेबाबत दि.२६ जानेवारी सह सर्व प्रमुख दिवशी म.न.पा. सन्मा.सदस्य यांच्या भाषणामध्ये लोकशाही निवडणुक व सुशासन या विषयावर कमीतकमी ३-४ वाक्य अंतर्भुत करणेबाबत सदर आदेशात नमुद केलेले आहे. सदरचे पत्र सन्मा.सभागृहात वाचण्यात येत आहे.

**नगरसचिव** :- स्थायी समिती सभेच्या विषयपत्रिकेवरिल विषयांना सुरुवात करणेत येत आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.सभापती महोदया, आयुक्त साहेब आणि उपायुक्त साहेब आले नाहीत ?

**मा.सभापती :-** येत आहेत.

**नगरसचिव** :- आता येथे कार्यक्रम होता तो संपल्यावर आयुक्त साहेब आपल्या कार्यालयात गेले ते लगेच येत आहेत.

**नगरसचिव :- विषय क्र. १:-** दि.२७/१२/२०१९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**श्री.प्रविण कोल्हे :-** प्रस्ताव मान्य करण्यात येत आहे.

**सौ.रेश्मा काळे :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.२१५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, दि.२७/१२/२०१९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त कायम करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- कोल्हे प्रविण रामदास**

**अनुमोदक :- काळे रेश्मा कुंदन**

**नगरसचिव :- विषय क्र. २:-** अमृत अभियान अंतर्गत पाणी पुरवठा योजनेची यांत्रिकी कामे करणेसाठी ई-१३८१/२०१९ मध्ये प्राप्त निविदा दरांपैकी श्री.भैरव ईलेक्ट्रोमेक वर्क्स जळगांव यांचे निविदा रकमेवर ३.४८ टक्के जास्तीचे दरास व त्यानुसार येणारा खर्च रु.८,३२,३३,४२२/- मात्र ला मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.सुनिल खडके :-** प्रस्ताव मान्य करण्यात येत आहे.

**सौ.प्रतिभा देशमुख :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २१६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, जळगांव पाणी पुरवठा योजनेच्या यांत्रिकी कामाची ई-निविदा १३८१/२०१९ रु.८,०४,३४,३०८/- अन्वये ३ ऱ्या वेळेस दि.२५/०७/२०१९ रोजी हिंदुस्तान टाईम्स या राष्ट्रीय दैनिकातून व दैनिक लोकमत राज्यस्तरीय आवृत्तीतून प्रसिध्द करण्यात आली होती. सदरचे काम करणेसाठी ०३ निविदाकारांनी सहभाग घेतलेला आहे.

१) हायटेक इंजिनियर्स मुंबई
२) श्री भैरव ईलेक्ट्रोमेक वर्क्स जळगांव
३) योगीराज पावरटेक मुंबई

उपरोक्त निविदा कारांच्या निविदा मधील तांत्रिक देकार ०१ दि.०७/०८/२०१९ रोजी उघडण्यात आले आहे. निविदांत प्राप्त तांत्रिक कागदपत्रे तपासणीसाठी मजीप्रा विभाग जळगांव यांचेकडेस तपासणीसाठी पाठविण्यात आलेली होती मजीप्रा विभागाने दि.२९/०८/२०१९ रोजी निविदा तांत्रिक कागदपत्रांची तपासणी केली असुन १) हायटेक इंजिनियर्स मुंबई २)श्री भैरव ईलेक्ट्रोमेक वर्क्स जळगांव ३) योगीराज पावरटेक मुंबई हे ३ निविदाकार पात्र ठरत असल्याने आर्थिक लिफाफा उघडण्याची शिफारस केली आहे. सदर कामी निविदाकारांच्या काही तांत्रिक बाबी अपुर्ण असल्याने कार्यकारी अभियंता, मजीप्रा विभाग जळगाव यांचे कडून मनपाने १३/०९/२०१९ रोजी खुलासा मागविलेला होता. मजीप्रा विभागाने दि.१०/०९/२०१९ रोजी खुलासा न करता ३ ही मक्तेदार पात्र ठरत असून आर्थिक लिफाफा उघडणे बाबत कळविले आहे. तदनंतर पुन्हा दि.५/११/२०१९ रोजी कार्यकारी अभियंता, मजीप्रा जळगांव यांनी तीनही मक्तेदारांच्या तांत्रिक पात्रतेबाबत कार्यकारी अभियंता, (यांत्रिकी) मजीप्रा मंडळ, नाशिक यांनी पाठविलेला सविस्तर खुलासा दिला असून कामाची ३ री मागणी असुन काम तातडीने पुर्ण होणे आवश्यक असून तीनही एजन्सीकडे निविदेनुसार मागणी केलेली कागदपत्रे व त्याआधारीत इतर कागदपत्रे उपलब्ध असुन ३ ही एजन्सीकडे पंपीग मशिनरी कामांचा पुरेसा अनुभव तसेच ऑटोमेशन च्या कामांचा सारखाच अनुभव असल्याचे दिसून येते असे कळविले आहे. त्यानुसार ३ ही निविदा धारकांचा वित्तीय देकार दि.७/११/२०१९ रोजी उघडण्यात आले असून त्यात प्राप्त दर खालील प्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| १) हायटेक इंजिनियर्स मुंबई | निविदा रकमेवर ४.२५ टक्के जास्त |
| २) श्री भैरव ईलेक्ट्रोमेक वर्क्स जळगांव | निविदा रकमेवर ३.५० टक्के जास्त |
| ३) योगीराज पावरटेक मुंबई | निविदा रकमेवर ४५ टक्के जास्त |

सदर कामी सर्वात कमी दर भरलेले मक्तेदार श्री भैरव ईलेक्ट्रोमेक वर्क्स जळगांव यांनी वाटाघाटी अंती निविदा रकमेवर ३.४८ टक्के जास्त दराने काम करण्यास सहमती दर्शविली आहे. त्यानुसार सदर दरांचे विश्लेषण करणेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना दिनांक १६/११/२०१९ रोजी कळविले असता मुख्य

अभियंता, प्रादेशिक विभाग नाशिक यांचे पत्र क्रं.मजीप्रा/मुअ/नाशिक/तांशा (यां)/१८५९/२०१९ दि.२०/१२/२०१९ अन्वये

| | |
|---|---|
| निविदेची रक्कम (दरसुची सन २०१७-१८) | रु.८,०४,३४,३०८/- |
| प्रचलित दरानुसार खर्च (दरसुची सन २०१९-२०२०) | रु.८,३४,८०,९२०/- |
| निविदा दरानुसार येणारा खर्च (३.४८ टक्के जास्त दराने) | रु.८,३२,३३,४२२/- |

विश्लेषण करुन पाठविले असून श्री भैरव ईलेक्ट्रोमेक वर्क्स जळगांव यांचे निविदा रकमेवर ३.४८ टक्के जास्तीचे दराने येणाऱ्या खर्चाची तुलना प्रचलित दरसुची २०१९-२० मधील दरानुसार येणाऱ्या खर्चाशी केली असता, या कामासाठी ०.२९६% कमी खर्च येत असल्याने निविदा स्विकृतीची शिफारस केली आहे.

उपरोक्त प्रमाणे सदर कामी श्री भैरव ईलेक्ट्रोमेक वर्क्स जळगांव यांचे प्राप्त निविदा दर ३.४८ टक्के जास्त व त्यानुसार येणारा खर्च रु.८,३२,३३,४२२/- हा प्रचलित दरसुचीनुसार येणाऱ्या खर्चापेक्षा कमी असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे प्रकरण ७ संविदा कलम ७३ (क) नुसार रक्कम रु.८,३२,३३,४२२/- मात्रची संविदा करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३ प्रतिकुल मते :- ००**
**सुचक :- खडके सुनिल वामनराव**
**अनुमोदक :- देशमुख प्रतिभा गजानन**

**नगरसचिव :- विषय क्र. ३**:- मटन मार्केट ओटे भाडयात वाढ करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** प्रस्ताव मान्य करण्यात येत आहे.

**श्री.प्रविण कोल्हे :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २१७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिकेच्या मटन मार्केट ओटे भाडयात १० टक्के वाढ करुन सन २०१९-२० करीता सदर मटन मार्केट मधील मटन विक्री करणे कामी ओटे भाडे तत्वाने एक वर्षाकरीता देणे कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमा चे कलम ३३२(क) ला अधिन राहून ओटे लिलाव करणे कामी दि.११/०६/२०१९ ते २९/०८/२०१९ व दि.०३/१२/२०१९ रोजी जाहिर सूचना प्रसिध्द करण्यात आली होती. सदर लिलाव सूचनेनुसार कोणत्याही मटन विक्री करणाऱ्यांनी प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे मागील वर्षी देण्यात आलेल्या ओटेधारकांना व यावर्षी मागील बिलात १० टक्के नैसर्गीक वाढ करुन बिले बजाविणे आवश्यक असल्याने मागील वर्षी देण्यात आलेल्या ओटेधारकांना यावर्षी मागील बिलात १० टक्के नैसर्गीक वाढ करुन बिले बजाविणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३ प्रतिकुल मते :- ००**
**सुचक :- पाटील राजेंद्र झिपरु**
**अनुमोदक :- कोल्हे प्रविण रामदास**

**नगरसचिव :- विषय क्र.** ४:- जळगांव शहर महानगरपालिका मालकीच्या डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी उदयान येथे जळगांव जनता सहकारी बँक लि.जळगांव यांना स्वखर्चाने नुतनीकरण करणेस परवानगी देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** प्रस्ताव मान्य करण्यात येत आहे.

**सौ.रेश्मा काळे :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सभापती महोदया, मला यावर एक सूचना करावीशी वाटते, ज्याप्रमाणे आपण भाऊंचे उदयान जैन उदयोग समुहाला व गांधी उदयान जैन उदयोग समुहाला दत्तक दिले आहे त्याच पध्दतीने या उदयानाच्या संदर्भातही आपण केशवस्मृती प्रतिष्ठानचे भरतदादा अंमळकर यांच्याशी बोललो. ज्या पध्दतीने हे दोन उद्याने जी आहे ते सुस्थितीत असल्या कारणाने आपली संस्था तेथे दर वर्षी २० ते २५ लाख रुपये. साधारणता भरतदादांनी सांगितल की, आमच्या संस्थेच्या माध्यमातुन १५ ते २० लाख रुपये आम्ही त्याच्यावर खर्च करु. मी म्हटलो, १५ ते २० लाख रुपये तुम्ही दर वर्षी खर्च कराल तर साधारणता ४-५ वर्षामध्ये ७०-८० लाख रुपये त्या उद्यानाला देतील त्यांची संस्था. परंतु त्याची देखभाल व दुरुस्ती जर कधी मनपाच्याच ताब्यात राहिली तर तुमचे तो खर्च पाण्यात जाईल. आणि त्या अनुषंगाने आपण ते उद्यान दत्तक घ्याव. त्याची देखभाल दुरुस्ती ज्या प्रमाणे भाऊचे उद्यानाची जैन उद्योग समुह करतो. त्या पध्दतीने जनता बँकेने या शामाप्रसाद मुखर्जी उद्यानाची देखभाल दुरुस्ती करावी अशी मी त्यांना विनंती केली. आणि त्यांनी ही विनंती मान्य ही केली. मी म्हटलो त्याच्या संदर्भात म.न.पा.च आज त्या कर्मचाऱ्यांच्या आस्थापने वरती जे काही खर्च होत असेल त्याच्यातला काही खर्च आम्ही तुम्हाला कॅम्पेनसेट ही करुन देऊ. १००% जबाबदारी तुम्ही स्विकारु नका. कारण तुम्ही विकास करण्याच्या संदर्भातली जबाबदारी स्विकारलेली आहे तेच आनंदाची गोष्ट आहे. परंतु त्या संदर्भात देखभाल दुरुस्तीसाठी लागणारा खर्च काही मनपा भार उचलेल आणि काही त्यांच्या संस्थेने उचलायच. जेणे करुन ते उद्यान कायम स्वरुपी मेनटेन राहील. या संदर्भातला सुध्दा मला वाटत आपण निर्णय घ्यावा. आणि त्यांना तसा प्रस्ताव द्यावा. आणि त्या प्रस्तावाची मान्यता घेऊन कायम स्वरुपी त्या उद्यानाची शोभा कायम राहील. कारण त्यांची संस्था त्या ठिकाणी १५ -२० लाख रुपये खर्च करणार आहे. ७०-८० लक्ष व जवळपास १ कोटीच्या ते खर्च करतील. परंतु तो केलेला खर्च भविष्यात मेनटेन राहिल का याची खात्री नाही. कारण आपल पुर्णता नियंत्रण त्या उद्यानांवर राहत नाही. जर कधी अश्या सेवाभावी संस्थेंच्या ताब्यात दिल. तर कमीत कमी डिसीप्लीन ही राहील आणि मेनटेन्नस ही योग्य पध्दतीने राहील. तर तो एक विचार व्हावा. आणि तश्याच पध्दतीने बळवंत रक्तपेढी आहे नवीपेठेत सरस्वती डेअरीच्या बाजुला आणि भरतदादा त्या केशवस्मृती संस्थेचे संचालक आहे. त्याच्या बाजुची स्वच्छता बोळ जी आहे तीची परिस्थिती इतकी वाईट आहे की डोळयांनी पाहिले जात नाही. अशी परिस्थिती आहे. मी भरतदादांना ती सुध्दा विनंती केली ही आपल्या माधवराव बळवंत रक्तपेढीला लागुन असलेली बोळ आहे. आपली संस्थेची जी सगळी वाहने आहे ती सर्व रस्त्यावर उभे राहतात. जेणे करुन ९ मिटरचा रोड आहे. त्या ९ मिटरच्या रस्त्यावरती शहरातला मध्यवर्ती भाग असल्याने वाहतुकीची नेहमी कोंडी होते. तर त्यांना आपण असा प्रस्ताव दिला की आपण ती जी स्वच्छता बोळ आहे पुर्णता मेनटेन करायची. तिच काँक्रीटींग व्यवस्थीत करायच. आणि तुमच्या जी दु चाकी आहे ते रस्त्यावर न लावता तेथे पार्कींग करायची. अश्या पध्दतीचा प्रस्ताव त्यांनी काल बारनिशीला दिला आहे. तोच प्रस्ताव मी आपल्या व्हॉटसअॅपवर टाकलेल आहे. तर त्या प्रस्तावावरती तुम्ही पुढच्या सभेला योग्य तो निर्णय घेतला तर स्वच्छता ही राहील आणि पार्कींगची समस्या ही कमी होईल. आणि मनपाला एक रुपया त्याच्यातुन लागणार नाही.

**मा.सभापती :-** संबंधीत विभागानी याची नोंद घ्यायायची आहे. पुढच्या सभेला आपण याच्यावर चर्चा करु.

**श्री.सदाशिव ढेकळे** :- भाऊच्या उद्यानाचा जो देखभाल आणि दुरुस्तीचा जो खर्च आहे. तो किती आहे.

**श्री.नितीन लढढा :-** आपण भाऊचे उद्यानाला नाही करतात गांधी उद्यानाचा करतो खर्च आणि भाऊंचे उद्यान विनामुल्य आहे.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** तरी गांधी उद्यानाला जे खर्च करतो किती आहे.

**श्री.सुनिल भोळे, शहर अभियंता :-** ते जवळपास खर्च ३.२५ लाख महिना आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** सभापती महोदया, आज ही आपले कर्मचारी तेथे लागत असतीलच. ते आपल्याला सोयीस्कर राहील आणि बगिचा ही चांगला होऊन जाईल.

**मा.सभापती** :- हो दोघांच्या संयुक्त विद्यमाने ते होईल.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २१८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिका मालकीच्या डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी उदयान येथे खालील बाबींचे नुतनीकरण करण्यास जळगांव जनता सहकारी बँक लि.जळगांव यांना स्वखर्चाने (१) उदयानातील लहान मुलांची विविध खेळणी दुरुस्ती/नवीन बनविणे व रंगरंगोटी करणे (२) उदयानात पिण्याच्या पाण्याच्या व्यवस्थेचे नुतनीकरण करणे (३) उदयानातील दुसऱ्या महायुध्दात शहिद

झालेल्या सैनिकांची नावे असलेल्या स्तंभचे नुतनीकरण करणेस खालील अटी शर्ती नुसार परवानगी देणेत येत आहे.

१) उदयानातील साधन साहित्यावर तसेच जागेवर बँकेचा कुठलाही हक्क राहणार नाही यासंदर्भात सर्व मालकी हक्क महानगरपालिकेचेच आहेत व राहतील.

२) साधन साहित्य तसेच नुतनीकरणांवर होणाऱ्या खर्चाची भविष्यात कुठलाही स्वरुपात किंवा आर्थिक स्वरुपात मोबदल्याची मागणी महानगरपालिकेकडे करता येणार नाही व मनपाकडून दिली जाणार नाही.

३) मनपास भविष्यात काही गरज वाटल्यास सदर साधने व बँकेचे फलक काढुन टाकण्याचा अधिकार आहे व राहिल.

मुख्य कार्यकारी अधिकारी जळगांव जनता सहकारी बँक लि.जळगांव यांचे दि.०९/०९/२०१९ रोजीचे पत्रानुसार वरील अटी शर्ती सह परवानगी देण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- पाटील राजेंद्र झिपरु**

**अनुमोदक :- काळे रेश्मा कुंदन**

**नगरसचिव :- विषय क्र. ५:-** महानगरपालिका हद्दीतील संपुर्ण मालमत्तांचे (जमिन व इमारती) जी.आय.एस.प्रणालीव्दारे सर्वेक्षण करणे कामी संपुर्ण मालमत्तांचे संगणकीकृत करमुल्य निर्धारण व कर आकारणी करणेकामी प्रभाग समिती क्र.१ ते ४ अंतर्गत **(अ)** मंजूर निविदेतील खर्चाव्यतिरिक्त जादा येणाऱ्या खर्च रक्कम रु.१,२७,९५,५२५/- अधिक रु.१९,०८,४१९/- एकूण रक्कम रु.१,४७,०३,९४४/- मात्रचे खर्चाला तसेच सदर काम करणेस मान्यता मिळणेबाबत तसेच **(ब)** प्रभाग समिती क्र.०३ चे अंतर्गत एम.आय.डी.सी. परिसरात नव्याने आढळून आलेल्या ५०० चौ.मी.पेक्षा अधिक क्षेत्राच्या मिळकतींची वरील कामे करण्यासाठी १,००४ मिळकती X रु.१०,०००/- प्रती मिळकत = एकूण रक्कम रु.१,००,४०,०००/- मात्र चे खर्चाला तसेच सदर काम करणेस मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.सुनिल खडके :-** प्रस्ताव मान्य. सदर खर्च व त्यावर लागणारा जी.एस.टी.ही असे सर्व खर्चास मान्यता देण्यात यावी.

**सौ.प्रतिभाग देशमुख :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २१९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, **(अ)** जळगांव शहरातील मिळकतींचे सर्व्हेक्षण करणे, नंबरिंग करणे, मोजमापे घेणे, संगणकीकृत डाटा तयार करणे वगैरे कामे करणेस स्थायी समिती ठराव क्र.५७७ दि.२७/१२/२०१६ अन्वये मे.स्थापत्य कन्सलटन्सी (इं) प्रा.लि.,अमरावती यांचे मंजूर निविदेस व दरांस मान्यता प्रदान केलेली असून कार्यादेश क्र.२२५३ दि.०४/०१/२०१७ अन्वये कार्यादेश दिलेला आहे. तसेच मक्तेदाराने दि.१८/०५/२०१७ रोजी करारनामा करुन दिलेला आहे. सदर निविदा प्रसिध्द करतेवेळी शहरात प्रभाग समिती निहाय व एकूण ९६,९४५ मिळकती होत्या, मात्र काम सुरु करतेवेळी ९७,००७ मिळकती अस्तित्वात आलेल्या होत्या. त्या खालीलप्रमाणे :

प्रभाग समिती क्र.०१ = २९,४६५

प्रभाग समिती क्र.०२ = २१,७५०

प्रभाग समिती क्र.०३ = २५,०८०

प्रभाग समिती क्र.०४ = २०,७१२

एकूण = ९७,००७

याप्रमाणे एकूण ९६,९४५ मिळकती होत्या. त्या अनुषंगाने मंजुर दर रु.५५५/- प्रती मिळकत प्रमाणे एकूण रक्कम रु.५,३८,०४,४७५/- मात्र चे खर्चास मान्यता प्रदान केलेली आहे.

प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र.०१ ते ०४ मार्फत प्राप्त अहवालांच्या अनुषंगाने शहरात नव्याने आढळून आलेल्या एकूण मिळकती ( झोन ए ३३९५५, झोन बी २३९३२, झोन सी ३०१०८ (सी झोनच्या (सी-०१

ते सी.०९) एकूण मिळकती ३१,२४२ पैकी सी-६ च्या मिळकती २,३८४ असून रहिवाशी मिळकती २०२, मोबाईल टॉवर २०,५०० चौ.मी.पेक्षा कमी क्षेत्राच्या औदयोगीक मिळकती १,०२८,५०० चौ.मी.पेक्षा जास्त क्षेत्राच्या औदयोगिक मिळकती १,१३४ इतक्या असून एकूण औदयोगिक विभागाच्या मिळकतींची संख्या २,१६२ मिळकती आहेत.) व झोन डी २३८४९ = अशा एकूण १,११,८४४ इतक्या मिळकतींची मोजमापे झालेली आहेत. तसेच त्यात पुढील ०४ महिन्यात ८ ते ९ हजार मिळकतीची वाढ संभाव्य आहे. करीता १,२०,००० - ९६,९४५ = २३,०५५ इतक्या मंजूर निविदे व्यतिरिक्त जादा मिळकतीचे काम मक्तेदाराकडून त्याच मंजूर दरात करुन घेणे आवश्यक आहे करीता पूढीलप्रमाणे खर्च येईल. एकूण मिळकती :- २३,०५५ X रु.५५५/- प्रती मिळकत = रु.१,२७,९५,५२५/- मात्र तसेच वार्षिक देखभाल दुरुस्तीसाठी देखील १२०००० मिळकती वजा ९७००७ = २२,९९३ मंजूर निविदे व्यतिरिक्त जादा मिळकतीचे काम मक्तेदाराकडून त्याच मंजूर दरात करुन घेणे आवश्यक आहे. करीता सदर सन २०१९-२० साठी पूढीलप्रमाणे खर्च २२,९९३ Xरु.८३/- =रु.१९,०८,४१९/- अपेक्षित आहे.

तरी मंजूर निविदेतील खर्चा व्यतिरिक्त जादा येणाऱ्या खर्च रक्कम रु.१,२७,९५,५२५/- अधिक रु.१९,०८,४१९/- असे एकूण रक्कम रु.१,४७,०३,९४४/- मात्र व त्यावरील लागणाऱ्या GST रकमेसह खर्चाला तसेच सदर काम करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७, कलम ७३ (क) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तसेच..,

**(ब)** जळगांव शहरातील मिळकतींचे सर्व्हेक्षण करणे, नंबरिंग करणे, मोजमापे घेणे, संगणकीकृत डाटा तयार करणे वगैरे कामे करणेस स्थायी समिती ठराव क्र.५७७ दि.२७/१२/२०१६ अन्वये मे.स्थापत्य कन्सलटन्सी (इं) प्रा.लि.,अमरावती यांचे मंजूर निविदेस व दरांस मान्यता प्रदान केलेली असून कार्यादेश क्र.२२५३ दि.०४/०१/२०१७ अन्वये कार्यादेश दिलेला आहे. तसेच मक्तेदाराने दि.१८/०५/२०१७ रोजी करारनामा करुन दिलेला आहे. सदर निविदा प्रसिध्द करतेवेळी प्रभाग समिती क्र.०३ चे कार्यक्षेत्रात ५०० चौ.मी.पेक्षा अधिक बांधीव क्षेत्र असलेल्या एकूण १३० मिळकती होत्या. त्या अनुषंगाने मंजूर दर रु.१०,०००/- प्रती मिळकत प्रमाणे एकूण रक्कम रु.१३,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान केलेली आहे.

तसेच प्रभाग समिती क्र.०३ चे अंतर्गत एम.आय.डी.सी. परिसरात नव्याने आढळून आलेल्या एकूण मिळकती झोन सी ३०१०८ (सी झोनच्या (सी-०१ ते सी.०९) एकूण मिळकती ३१,२४२ पैकी सी-६ च्या मिळकती २,३८४ असून पैकी रहिवाशी मिळकती २०२, मोबाईल टॉवर २०,५०० चौ.मी.पेक्षा कमी क्षेत्राच्या औदयोगिक मिळकती १,०२८,५०० चौ.मी.पेक्षा जास्त क्षेत्राच्या औदयोगिक मिळकती १,१३४ इतक्या असून एकूण औदयोगिक विभागाच्या मिळकतींची संख्या २,१६२ मिळकती आहेत.) एकूण १,१३४ इतक्या मिळकतींची मोजमापे झालेली आहेत. तसेच करीता १,१३४ – १३० = १,००४ इतक्या मंजूर निविदेत १३० मिळकती या ५०० चौ.मी.पेक्षा जास्त क्षेत्राच्या नमूद करण्यात आल्या होत्या. मात्र २०१८-१९ मध्ये मोजमाप करताना तसेच दि.१७/०९/२०१९ ते दि.२०/०९/२०१९ या कालावधीत म.न.पा.पथकाने केलेल्या पडताळणी अंती प्रत्यक्ष जागेवर ५०० चौ.मी.पेक्षा जास्त क्षेत्राच्या एकूण १,१३४ मिळकती आढळून आल्या. म्हणजेच १३० मिळकती व्यतिरिक्त ५०० चौ.मी.पेक्षा जास्त क्षेत्राच्या एकूण १,००४ जादा मिळकतीचे काम मक्तेदाराकडून त्याच मंजूर दरात करुन घेणेस व मंजूर निविदेपेक्षा होणारा जादा खर्च १,००४ X रु.१०,०००/- प्रती मिळकत याप्रमाणे एकूण रक्कम रु.१,००,४०,०००/- मात्र व त्यावरील लागणाऱ्या GST रकमेसह महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७, कलम ७३ (क) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- खडके सुनिल वामनराव**

**अनुमोदक :- देशमुख प्रतिभा गजानन**

**नगरसचिव :- विषय क्र. ६:-** जळगांव शहर महानगरपालिका हददीत व हददीबाहेर दि.०९/१२/२०१९ ते दि.१५/१२/२०१९, दि.१६/१२/२०१९ ते दि२२/१२/२०१९ व दि.२३/१२/२०१९ ते दि.२९/१२/२०१९ या कालावधीत

लागलेल्या आगीबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २८९ अन्वये अग्निशमन विभागाकडील अहवालाची माहिती घेणे.

**श्री.प्रविण कोल्हे :-** माहिती घेतली.

**सौ.प्रतिभा देशमुख :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २२० पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिका हददीत व हददीबाहेर दि.०९/१२/२०१९ ते दि.१५/१२/२०१९, दि.१६/१२/२०१९ ते दि२२/१२/२०१९ व दि.२३/१२/२०१९ ते दि.२९/१२/२०१९ या कालावधीत लागलेल्या आगीबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २८९ अन्वये अग्निशमन विभागाकडील अहवालाची माहिती घेतली.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- कोल्हे प्रविण रामदास**

**अनुमोदक :- देशमुख प्रतिभा गजानन**

**नगरसचिव :- विषय क्र. ७:-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १०५ (१) व १०६(१) अ अन्वये लेखा परिक्षण विभागातील दि.२३/१२/२०१९ ते दि.२७/१२/२०१९ अखेर संपणाऱ्या साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा मुख्य लेखापरिक्षक विभागाकडील अहवालाची माहिती घेणे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** माहिती घेतली.

**श्री.प्रविण कोल्हे :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २२१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १०५ (१) व १०६(१) अ अन्वये लेखा परिक्षण विभागातील दि.२३/१२/२०१९ ते दि.२७/१२/२०१९ अखेर संपणाऱ्या साप्ताहिक लेखा तपासणी अहवालाची माहिती घेतली.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- पाटील राजेंद्र झिपरु**

**अनुमोदक :- कोल्हे प्रविण रामदास**

**नगरसचिव :- विषय क्र. ८:-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेणे.

**श्री. प्रविण कोल्हे:-** माहिती घेतली.

**सौ.रेश्मा काळे :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २२२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेतली.

१. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./११० दि.३०/१२/२०१९ अन्वये जळगांव शहरामधिल ठिकठिकाणच्या रोड डिव्हायडर मध्ये बोगन वेलची लागवड करणे व संगोपन करणे कामी मक्तेदार श्री.संदेश ज्ञानदेव टेकाडे यांचे निविदा रकमेवर ०५% सर्वात कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.२१,८५,७२२/- मात्र खर्चाची संविदा.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- कोल्हे प्रविण रामदास**

**अनुमोदक :- काळे रेश्मा कुंदन**

**श्री.नितीन लढढा :-** लोकमतच्या पेपरामध्ये स्वच्छ सर्व्हेक्षणात हगणदारी फक्त नावावरती आहे. नागरीकांचा फिडबॅक म्हणुन भरली जाते माहिती. ओल्या व सुक्या कचऱ्याचे वर्गीकरण नाही. कचऱ्यावर प्रक्रिया ही जमे ना. स्वच्छ सर्व्हेक्षण हे फक्त कागदी घोडे. आता ही वस्तुस्थिती जी आहे १००% नाकारता येणार नाही. आज आपण बघतो मोठा खर्च आपण आरोग्यावर करत आहे. जरी ही वस्तुस्थिती वृतपत्राने मांडलेली आहे. परंतु या ठिकाणी सामान्य नागरीक असो, किंवा पदाधिकारी असो यांच्या दृष्टीकोणातुन ही बाब जी आहे ही गंभिर आहे. आणि बऱ्याच वेळा या सभागृहात या विषयावर चर्चा ही करण्यात आली. परंतु चर्चा अंती ज्या वेळेला आपण चर्चा करतो, स्वच्छ सर्व्हेक्षणच्या वेळेला केंद्र शासनाच्या अधिकाऱ्यांचे असतील राज्य शासनाच्या अधिकाऱ्याचे असतील. त्याच वेळेला स्वच्छता इतर दिवसांपेक्षा थोडी व्यवस्थीत दिसुन येते. पुन्हा एकदा सर्व्हक्षणची टिम गेली. रँकींग मिळाल, पुन्हा स्थिती जैसे ते तैसे. हा अनुभव आजचा नाही हा वर्षानुवर्षाचा आहे. म्हणजे जेव्हा आम्ही सत्तेत होतो त्यावेळेलाही परिस्थिती हीच होती. त्या वेळेला हेच कर्मचारी असतात हेच अधिकारी असतात. परंतु जसी लग्नाची तिथी जवळ येते त्या वेळेला धावपळ वाढते. अश्या पध्दतीने सर्व्हेक्षणाची टिम येते. ते चार पाच दिवस तो सप्ताह योग्य पध्दतीने स्वच्छता राबविली जाते. आपण ऐवढे पैसे स्वच्छतेवर खर्च करत असतांना सुध्दा १२ महिने अशा रिझल्ट का मिळत नाही. याच्या संदर्भात आता नेमकं आता करणार काय ? सदस्य याच्यावर वारंवार चर्चा करत असतात. प्रशासनही प्रयत्न करत असतो. परंतु ऐन्ड रिझल्ट मिळत नाही. सातत्याने आपण पाहतो ३ वर्षी सुध्दा इंदौर शहराचा क्रमांक हा पहिला आला. एखाद्या गोष्टीच सातत्य कश्या पध्दतीने टिकुन ठेवलं पाहिजे हे ज्या वेळी इंदौर राबवु शकतो त्या वेळेला आपण का राबवु शकत नाही. शेवटी यंत्रणा आपल्याकडे ही आहे. मोठा पैसा आपण ही खर्च करतो. मा.आयुक्त साहेब आपण स्वत: महाराष्ट्र सर्व्हेक्षण मध्ये खुप चांगल्या पध्दतीने कार्य केलेले आहे. परंतु जळगांव मध्ये असे काय घडुन आले आहे की, जेणे करुन येथे ते राबविता येत नाही. किंवा ऐन्ड रिझल्ट पर्यंत पोहचत नाही. कदाचित आपल्या कडे पैसा कमी असेल आणि पैसा खर्च करण्याची ऐपत नसेल त्या वेळेला अशी परिस्थिती असली तर आपण एक वेळेला समजु शकतो की हो आमची आर्थिक परिस्थिती नाजुक असल्या कारणाने त्याच्या वरती योग्य प्रमाणे निधी उपलब्ध करुन देऊ शकत नाही. त्याच्यामुळे ही गोष्टी जी आहे नागरीकांना ही मान्य करावे लागतील पदाधिकाऱ्यांना ही मान्य करावे लागतील. परंतु आज वाहने मोठया प्रमाणावर उपलब्ध करुन दिले, आपण कर्मचारी मोठया प्रमाणावर उपलब्ध करुन दिले. परंतु स्थिती मध्ये खुप काही सुधारणा झाली असे नाही. या परिस्थितीच्या संदर्भात वृतपत्रात एक टेंडर ही पब्लीश झालेल आहे आरोग्याच्या संदर्भात की त्याच्या मध्ये साधारणता प्रभाग क्र.२,३,४ याच्यासाठी कमगार पुरवठा करण्याच्या संदर्भात वाहन चालक उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीकोणातुन आपण एक मक्तेची निविदा काढलेली आहे. आपण ज्या वेळेला मक्ते दिला त्या वेळेला आपली सर्व वाहने ही मक्तेदाराला सुपुर्द केलेली आहे. आणि ते वाहने सुपुर्द केल्यानंतर जळगांव महापालिकेच्या आस्थापनावरुन वाहन चालक हे आजच्या दृष्टीकोणातुन सरप्लस आहे. म्हणजे वाहने कमी आणि वाहन चालक जास्त आज अशी परिस्थिती आहे. बरेच वाहन चालक काय करत असतील त्याची कल्पना सुध्दा नाही. आणि पुन्हा वाहनचालाकंची रिकवायरमेंट आजच्या वृत्तपत्रात दिसुन येते. म्हणजे नेमक काय ? वाहनचालकांना बसुन पागार देण्याच्या संदर्भातली काही नविन योजना आपण काढलेली आहे. किंवा नेमक काय कारण आहे त्याच ही दादपुकारा होत नाही.

**श्री.नावनाथ दारकुंडे :-** त्यांनी तिनच प्रभाग घेतलेले आहे प्रभाग क्र.०१ पण घेतलेला नाही.

**श्री.नितीन लढढा :-** त्यांच म्हणण आहे की, सर्व कायम कर्मचारी जे आहे ते प्रभाग क्र.०१ मध्ये द्यायचे.

**मा.आयुक्त :-** सन्मा.नितीनजी लढढा यांनी जे काही मुद्दे उपस्थित केले. त्या संदर्भात स्वच्छता सर्व्हेक्षण हे संपुर्ण देशात २०१६ पासुन चालु आहे. त्याची व्याप्ती २०१९ पासुन मोठया प्रमाणावर वाढलेली आहे. आणि जवळपास ४००० शहरांनी त्याच्यात भाग घेतला. सन २०२० मध्ये त्याची व्याप्ती परत वाढविण्यात आली. आपण जे ॲब्जरवेशन सांगितल. त्या संदर्भात गेल्या वर्षात जानेवारी मध्ये ते इव्हयाल्युवेशन करुन मार्क देवुन ते जात होते. आणि जे काही परिस्थिती असेल त्याच्या प्रमाणे रॉंकींग मिळत होत. या वेळेस त्यांनी अस केल. पहिल्या तिमाही पासुन मार्च, जुन, सप्टेंबर आणि डिसेंबर असे तिन्ही कॅटरचे मार्क वेळोवेळी घेतले. आता जरी टिम आली तर प्रत्येक तिमाही मध्ये तुम्ही काय काम केले. त्याच्यावर इव्हयाल्युवेशन होणार आहे. नुसता आता आली चालल त्याच्यावर रॉंक नाही मिळणार. आणि सर्व साधारणपणे जळगांव शहराचा प्रश्न आहे त्याप्रमाणे बऱ्याच शहरांच आहे. समझा संत गाडगेबाबा स्वच्छता अभियानाची टिम येणार तर त्या वेळेस एक आठ दिवस चांगल काम करणार आणि पुन्हा जैसे थे वैसे. आता कुठे तरी ही वृत्तपत्रकारीता आवश्यक आहे. आता याच्यासाठी आपल्याला जे काही प्रॉब्लम होतो, सोईसुविधा आहे, निधी कमी आहे का ? बिल्कुल नाही. निधी पुरेसा आहे. आपल्याला महानगरपालिकेकडुन किंवा स्थायी समिती कडुन मान्यता मिळत नाही का ? असे ही काही नाही. प्रस्ताव आला की लगेच मान्यता मिळते. मग कमी काय पडत, कमी फक्त इच्छाशक्ती पडते. आणि आपल्याला दिवसेंदिवस जी सवई लागलेल्या आहे. तर त्या मोडण्यासाठी आपल्याला सक्ती

करावी लागेल. एक दोन गोष्टी प्रामुख्याने मी नमुद करु इच्छितो की, आपल्यापैकी किती लोकं ओला कचरा सुका कचरा वेगवेगळा देता. आपल्या सभागृहात फक्त दोन टक्के आहे म्हणजे संपुर्ण शहरामध्ये जास्तीत जास्त २०% असतील. घनकचरा व्यवस्थापनामध्ये कचऱ्याच वर्गीकरण ही अतिशय मुलभुत बाब आहे. आणि ज्या शहराने सेगरिगेशनच काम अत्यंत चांगल्या प्रकारे केलेल आहे. त्या शहराला सगळयाच प्रक्रिया अतिशय सोप्या जातात. आणि असे शहर फक्त कोकणामध्ये आहे. काही गोष्टींच प्रमाण मोठया शहरामध्ये दाखविल जात पण तस नसत. जर सेगरिगेशन व्यवस्थीत झाल तर सर्व प्रक्रिया ओल्या कचऱ्याच्या वेगळया आणि सुख्या कचऱ्याच्या वेगळया होतील. आणि १०% फक्त डंपींग ग्राऊंडला जायला पाहिजे. म्हणजे आपण नागरीकांना कचरा घेतांना कुठेतरी कटुपणे घेऊन ही सवय लावली पाहिजे. दुसरा मुद्दा जो आहे तो आहे इच्छाशक्तीचा, आपल्या अधिकारी कर्मचारी मध्ये जे सातत्य आवश्यक आहे ते ठेवण्यामध्ये कुठेतरी कमीपणा येत आहे. आणि कुठेतरी कारण दिली जातात. तरी ही बाब आपल्या कर्मचाऱ्याच्या कायक्षमतेशी निगळीत आहे. तर त्याच्यात ही आपल्याला बदल करावा लागणार आहे. दुसरा मुद्दा जो आहे तो हगंदारी मुक्तीचा असेल. गेल्या चार वर्षात आणि आजच्या परिस्थितीत खुप बदल पडलेला आहे. जर आपण पाहिल की, मेहरुणची पलीकडेची बाजु तर त्या ठिकाणी अजुनही काही प्रमाणात उघड्यावर लोक शौचालयला बसतात. बऱ्याच ठिकाणी आपण शौचालयासाठी सोईसुविधा देतो पण त्याचा वापर केला जात नाही. टिम यायच्या वेळेला त्याचावर बराच खर्च केला जातो, लाईटसाठी, पाणीसाठी, आणि त्या प्रमाणपत्रासाठी पुन्हा सहा महिन्यानंतर टिम येईल आणि पुन्हा तोच खर्च करावा लागतो. जे शौचालय वापरणारे आहे हे त्यांचे निदर्शनास आणुन देणे गरजेचे आहे. मध्यंतरी आपण एक अशी माहिती घेतली होती. की त्या दिवशी साधारणता १९ हजार लोकं कम्युनल टॉयलेट वापरत होते. प्रत्येक्ष जर जागा नसली अशी काढली तर बाकीच्यांना आपण वैयक्तीक शौचालय दिल तर हा काम निश्चितपणे कमी होईल. दुसर जे काही आपण टेंडर काढल. ॲमरजन्सी व्यवस्था म्हणुन काढलेल आहे. बऱ्याच वेळी मी आपल्याला सांगतो, मागच्या वर्षी सांगितल, एक आपण अंतिम नोटीस देतो ती दिलेली आहे. आणि दुसरी,

**श्री.नितीन लढढा :-** पुर्व तयारी आहे.

**मा.आयुक्त :-** हा असे म्हणायला हरकत नाही. उद्या जर आपल्याला गरज पडली. आज अस आहे की, ८५ घंटागाडया आहे. एक ६ ड्रायव्हर्स आले नाही. आरोग्य खात्यात २० ड्रायव्हर बसलेले असतात पण आरोग्याधिकारी आणि उपायुक्तांना सुचना नाही की, त्यातुन ६ ड्रायव्हर त्या घंटागाडयांवर पाठविले पाहिजे. हे कुठेतरी चुकीच्या गोष्टी होत आहे. उद्या समजा ८० चे ८० आले नाही तर कमीत कमी ब्रेकडाऊन एक दिवस असेल पण त्याच्या दुसऱ्या दिवशी आपल्याकडे यंत्रणा असेल. संबंधीत निर्णय येता येताच आपल्याला पुर्व तयार करावी लागत आहे. त्याचा ठेक्याशी ही काही संबंध नाही. आपल्याला वर्षभर वेळोवेळी मॅनपावर लागते. त्यासाठी ही पुर्व तयारी आहे. आणि त्यासाठी हे नियोजन आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदया, प्रभाग क्र.२,३,४ घेतले प्रभाग क्र.०१ का घेतले नाही टेंडर मध्ये.

**मा.आयुक्त :-** हे प्रभागांसाठी घेतलेले आहे पण कुठेही वापरता येईल आपल्याला हे कर्मचारी.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** मी मागील सभेमध्ये शनिपेठ आराखड्याचा विषय मांडला होता. त्याच काय झाल. १९९३ मध्ये मंजुर आहे ते, आजही पेपरला दिलेले आहे.

**श्री.ईस्माईल शेख, नगररचना विभाग :-** माहिती घेऊन सांगतो.

**मा.सभापती :-** ही जी.आर.ची कॉपी यांना देऊन द्या.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** पंतप्रधान आवास योजना मध्ये आता पर्यंत ८५४६ फॉर्म घरांसाठी भरुन झालेले आहे. त्याचा पाठपुरावा कुठपर्यंत झालेला आहे.

**श्री.सुनिल भोळे, शहर अभियंता :-** याच्यामध्ये जे काही फॉर्म आलेले आहे. आणि काही नागरीकांचे ही आपल्याकडे अर्ज आलेले आहे. व्यक्तीगत अर्ज केलेला आहे त्यांची स्क्रुटनी करुन त्यांचे नकाशे तयार करुन त्यांना मंजुऱ्या दिल्या जात आहे. असे ही निदर्शनास आलेले आहे की, आपण मंजुरी दिल्यानंतर ही त्यांनी कामाला सुरुवात केलेली नाही. त्यांना अस वाटत की, त्यांची १००% जागा वापरात यायला पाहिजे. तसे नाही. टाऊन प्लॅनींग प्रमाणे सर्व प्रश्न सोडविला जातो.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** माझ्या माहितीनुसार १०२० घर मंजुर झाले. त्यात काही बांधकामचे आहे काही आपल्याला बांधुन द्यायचे आहे. आपले अधिकारी कुठेतरी कमी पडतात. त्यांना मंजुरी मिळालेली आहे पण आपण कळवत नाही त्यांना.

**श्री.सुनिल भोळे, शहर अभियंता :-** आपले लोक सातत्याने त्यांच्याकडे जात आहे.

**मा.सभापती :-** आपली करारनाम्याची प्रोसिजर काय आहे ? त्यांना मंजुरी दिलेली असते का ?

**श्री.सुनिल भोळे, शहर अभियंता :-** त्यांना मंजुरीच पत्र दिल जात.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** पुढच्या सभेमध्ये तुम्ही या विषयाचा संपुर्ण खुलासा द्या.

**श्री.सुनिल भोळे, शहर अभियंता :-** हो देतो.

श्री.सदाशिव ढेकळे :- साहेबांनी या ठिकाणी शौचालय साफसफाईच सांगितल. हगणदारी मुक्त, आपण जो शौचालय सफाईच काम देतो. ती व्यवस्थीत साफसफाई होत नाही. केल तर पेमेंट मिळतच पण नाही केल तरी ही पेमेंट मिळत. तर स्वच्छता पर हेड जर अस काम केल तर मला वाटत चांगली स्वच्छता होईल आणि हगणदारी मुक्त होईल्. तर अस करायला हरकत नाही. आपल काय मत आहे याच्या बद्दल.

**मा.आयुक्त :-** माझेपण असेच मत आहे. आता मागच्या वेळेस आता आपला जो काही जुना कॉन्ट्रॅक्ट आहे तो एप्रिल मध्ये संपत आहे आणि नविन प्रस्ताव आलेला आहे. तो प्रस्ताव आहे तसा करुन टेंडर प्रसिध्द होणार होता. मी सांगितले पहिले मला अटीशर्ती दाखवा. अटीशर्ती एकदा फिक्स करुन घेऊ आणि मग त्याप्रमाणे टेंडर करुन घेऊ.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** आता काय होत ज्याने ठेका घेतला आता तेथे पाणी नाही. जेथे बोरींग आहे तेथे लाईट नाही. काही वेळेला पाणी कमी येत असे वेगवेगळे कारणे सांगता. माझ्या एरिया मध्ये, स्लम एरिया आहे. तेथे जर शौचालय मध्ये घान असेल. तर लोक तेथे जात नाही आणि खुल्या जागा मध्ये जाऊन बसतात. घान दिसते हे होऊ नये म्हणुन माझे हे म्हणणे आहे. दुसर माझ्या घराच्या रस्त्यांवर खड्डे पडलेले आहे माझ्या घराच्या आजुबाजुचे सर्व रस्ते खड्डे मय झालेले आहे. ते होत नाही. आणि परत परत सांगुन २५-३० लोक आता माझ्या घरी आले होते परवा, त्यांनी सांगितले की, बघा हो तुमच्या घराजवळ असी परिस्थिती आहे. तर ते लवकर झाल पाहिजे अशी विनंती आहे. आणि विनंती करुन सुध्दा मी थकलो. साहेबांना सांगितल आमचे जे जे.इंजिनिअर आहे त्यांना सांगितल. एक महिन्यापासुन सांगत आहे. तुमच काम सोमवार पासुन सुरु होईल. पण अजुन झाले नाही.

**श्री.नितीन लढढा :-** ढेकळे साहेब तुमची भाषा जी आहे खुप मवाळ आहे. तुम्ही असे मुळात शिवसैनिक आहात. शिवसैनिकाची भाषा कशी असायला पाहिजे. तुम्ही शिवसेनेतुन काय गेले तुमचा प्रभावच कमी होऊन गेला. म्हणजे त्यांनी शिवसेनेत राहुन विधानसभा सुध्दा लढविलेली आहे. बाळशिवसैनिक आहे ते आम्हाला दुख होत आहे की, एक शिवसैनिक इतके जेष्ठ असुन सुध्दा काम होत नाही. खुप मनाला वाईट वाटत. ज्या विषयावर ढेकळे साहेब बोलले, त्याच रस्त्याच्या समस्या मीच सभागृहात मांडल्या होत्या. मला बोलणे योग्य वाटले नाही. परंतु वस्तुस्थितीच ती आहे. सभापती साहेबा, काव्यरत्नावली चौक आज जळगांव शहरातला एकमात्र सर्वात चांगला चौक आहे. त्या चौकाचा आपला एक वेगळ महत्व आहे. त्या चौकाचा क्लास आपण बघाल तर विविध वयोगटातील क्लास तेथे असतात. म्हणजे युवा पासुन तर जेष्ठ नागरीकांपर्यंत. चारही कॉर्नर बघाल तर तेथे रात्री ९.३० ते १०.०० वाजे पर्यंत जेष्ठ नागरीक आपल्या घरांमध्ये काही ना काही कारणामुळे व्यथीत झालेले असतात. ती मंडळी कुठेतरी आपल मन रमवण्याच्या दृष्टीकोणातुन त्या ठिकाणी गप्पागोष्टी करुन आपल जिवन व्यतीत करत असतात. आज काव्यरत्नावली चौक इतके दुर्मीळ अवस्थेत आहे आणि त्याच्या पेक्षा वाईट अवस्थेत आहे काव्यरत्नावली चौक ते रामानंद नगर पर्यंतच्या रस्त्याची. मी साधारणता तेथे रोज माझ्या मुलीला सोडायला जातो. जेव्हा मी गाडी मधुन उतरतो तेथे कमीतकमी त्या भागाचे १०-१५ नागरीक जे माझ्या परिचयाचे नाही पण कुठेतरी त्यांना परिचय माझा असेल ते येतात आणि म्हणतात की मागे ही मी सभागृहात या रस्त्याबाबत चर्चा केलेली होती. तर साधारणता मला त्या भागातुन १०-१५ लोकांचे फोन आले धन्यवाद बोलण्याच्या दृष्टीकोणातुन की आपण कमीतकमी रामानंद नगर रस्त्याचा विषय आपण चर्चा केली. आज परिस्थिती अशी आहे सर, मी वृत्तपत्रकारांना ही विनंती करतो की त्यांनी एक सर्वे असा करायचा. त्या रस्त्याने जाणारे नागरीक जे तेथुन रहिवास करतात. त्यांच्या प्रतिक्रिया विचारा. अक्षरश: मी म्हणतो एक ही फ्लॅट एक ही घर अस नसेल ज्यांच्या घरात रुग्ण नसेल. कारण सातत्याने एक वर्षापासुन इतकी वाईट परिस्थिती झालेली आहे. सातत्याने आम्हाला आमच्या घराच्या दरवाजे व खिडक्या २४ तास बंद ठेवावे लागतात. मला वाटत मा.जिल्हाधिकारी साहेबांच ही निवास स्थान ही त्या ठिकाणी आहे. कदाचित जिल्हाधिकारी साहेब सुध्दा हतबल झालेले असतील. ज्यांचे संपुर्ण जिल्ह्यावर नियंत्रण आहे. मला वाटत त्यांनी ही सुचना केले असतील परंतु त्यांची सुचनांच ही दुर्लक्ष झाल असाव. त्या रस्त्यावर भाजी विक्रेता भाजी विक्री करतात. सायंकाळी काही फ्रुट स्टॉल लागतात. अत्यंत अनहायजेनिक पध्दतीने मातीचा धुर उडत असतो. आणि तश्या परिस्थिती मध्ये ते त्यांचे खाद्यपदार्थ विकतात. आणि बरीच मंडळी तेथे काही ना काही खात राहतात. मी डॉ.दातार यांचेकडे मला घसेचे त्रास होता म्हणुन गेलो होतो. त्यांनी मला म्हटल, ते ई.एन.टी. स्पेशलिस्ट आहे. त्यांनी सांगितले की, या सहा महिन्यामध्ये इतकी पेशन्टची संख्या वाढुन गेलेली आहे. माझा त्या गोष्टीशी संबंध नाही परंतु ज्या वेळेला छाती मध्ये घरघर होते आणि घसा खोखोतो. त्या वेळेला माझ्या कडे येतात आणि त्यांना निमोनीया डिटेक्ट होतो. त्या निमोनिया पेशन्टची संख्या इतक्या मोठया प्रमाणात वाढली. फक्त धुरीच्या कारणाने, मला वाटत सर तो विषय तुम्ही कुठेतरी गांभिर्याने घ्यावा. मी या निमित्ताने आपल्या फक्त अल्टीमेटम देत आहे. गेल्या मागच्या महिन्यात महासभेत ही चर्चा केलेली होती स्थायी समिती सभेत ही चर्चा केलेली होती. परंतु पुढच्या १५ दिवसाच्या आत मध्ये त्या रस्त्याचा विषय मार्गी नाही लागला तर मी निश्चितपणे म्हणतो,

एखादी लक्षवेधी मांडण्याची मला गरज भासेल. आपण सुध्दा एखाद्या ऑफिस कामानिमित्त जात असाल किंवा गेले असाल तर अत्यंत वाईट परिस्थिती आहे म्हणजे रस्ता नावाला सुध्दा नाही. कुठल्याही स्थितीत १५ दिवसाचा वेळ मी आपल्याला देऊ इच्छितो की, १५ दिवसात तो रस्ता पुर्णत्व व्हावा वाटल तर तुम्ही स्वत: जावुन त्या रस्त्याची पाहणी करा, त्यांच्या व्यथा ऐका मी निश्‍चितपणे तुम्हाला म्हणतो दुख होईल तेथील कुटुंबांच की, एकही दरवाजा किंवा खिडकी तुम्हाला उघडी दिसणार नाही. इतकी वाईट परिस्थिती आहे. मला या संदर्भात आश्‍वासन पाहिजे की, पुढच्या १५ दिवसात तो रस्ता पुर्ववत होईल का ?

**श्री.सुनिल भोळे, शहर अभियंता :-** सभापती ताई, या रस्त्याच्या बाबतीत आपण मक्तेदार जैन इरिगेशन सिस्टीमचे जे अधिकारी आहे त्यांना आपण हे केलेले आहे की, त्वरीत हा रस्ता चालु करा, त्यांच म्हणण होत की, त्यांच्याकडे चार टिम तयार करण्यात आलेली आहे. त्यामध्ये पहिलाच रस्ता आम्ही काव्यरत्नावली चौकाचा घेत आहे. दुसरा रस्ता गिरणा टाकी ते पॉलिटेकनिक कॉलेज कंपाऊंडचा रस्ता.तिसरा शिवाजी नगरचा मेन रोड, चौथा मेहरुण पासुन गावाकडे जो रोड येतो असे चार रस्ते मी त्यांना सांगितले आहे. बहुतेक उद्यापासुन ते सुरु होईल.

**मा.सभापती :-** त्यांना परत सांगा, आणि हा विषय अत्यंत इमरजन्सीच आहे आणि जो जो विषय नितीन भाऊंनी मांडले ते विचार करण्या सारखे आहे. याची इमरजन्सी लक्षात घेता आजच स्मरणपत्र त्यांना द्याव. लगेच हे काम सुरु झाले पाहिजे याची दक्षता घ्यावी.

श्री.नितीन लढढा :- सभापती महोदया, त्यांचेकडुन जे काही कायदेशीर रित्या करुन घेणे, त्याच्यातुन ही समस्या पुर्णपणे निकाली निघणार नाही. कारण मक्तेदाराकडे फक्त पाईपलाईनची जी चारी आहे ती फक्त ३ मीटरची आहे. म्हणजे त्याच्यातुन फक्त १० फुटाचा मध्य रस्ता तयार होईल. आणि १० फुटाच्या रस्त्यावरुन एक ही वाहन व्यवस्थीत जाणार नाही. मग बाकीचा ७.५ ते ८.५ मिटरचा जो रस्ता शिल्लक राहिन त्याच नियोजन काय ? या वेळेला समजा त्या ३ मिटरच्या पट्टया वरुन वाहतुक चालेल पर्यायाने जागा मिळणार नाही म्हणुन वाहतुक तशीच सुरु राहील. आणि त्या नागरीकांची त्या त्रास मधुन सुटका होणार नाही. याच नियोजन काय ते सुध्दा करणे गरजेचे आहे. सर एक किरकोळ गोष्ट आहे की, तेथे साधारणता १-१ ते १.५ - १.५ फुटाचे खड्डे पडलेले आहे. आपल प्रशासन आहे, आपला जुनियर इंजिनिअर असेल, मुकादम असेल जो कोणी असेल एक चांगल्या साद्या माणसालाही कळेल, म्हणजे ५ ते ६ फुटाचे खड्डे आहे आणि १.५ -१.५ फुट रुंद आहे. साधारणता त्या खड्डयांवर मुरुम टाकुन लेव्हल केलेल असत तर एक सामान्य नागरीकांना समाधान मिळाल असत की, धुळ उडत आहे पण खड्डयात गाडी अप ॲण्ड डाऊन होत आहे. मला सांगा शासकीय विश्रामगृह आहे तेथे, मंत्री महोदय येतात, अधिकारी वर्ग येतात आणि याच्याने काय मॅसेज जातो शहराला. जिल्हाधिकारी सुध्दा त्या ठिकाणी राहतात. दिवसातुन दोन ते तिन वेळा ते त्या रस्त्यावरुन ये-जा करतात. परंतु साध्या माणसाला दिसु शकतो असा खड्डा आपल्या अधिकाऱ्याला का दिसत नाही. फक्त मक्तेदाराने त्याच काम सुरु करुन काम भागणार नाही. त्या सोबत आपल नियोजन सुध्दा तातडीने करणे गरजेचे आहे.त्याच्या संदर्भातच मी चर्चा करत आहे. ही सुचना मी मागे ही मांडली होती की, ही स्ट्रीप तो मेनटेन करुन घेईल परंतु उर्वरीतच काय ? तर त्याच्या संदर्भात नियोजन काय भोळे साहेब स्पष्ट करा.

**श्री.सुनिल भोळे , शहर अभियंता :-** त्याला मान्यता मिळालेली आहे. त्यांची निविदा प्रसिध्द बि. ॲन्ड .सी मार्फत झाली आहे.

**श्री. नितीन लढढा :-** मान्यता मिळाली हे मान्य आहे परंतू मी ही चर्चा यापूर्वी ही केलेली आहे की त्या ४२ कोटीच्यां कामांसाठी कितीवेळ नागरीकांना वेठीस धरु.

**मा.आयुक्त सो :-** भोळे टेंडर निघाले आहे का ?

**श्री.सुनिल भोळे , शहर अभियंता :-** होय साहेब निघाले आहे.

**श्री. नितीन लढढा :-** मान्य आहे टेंडर निघाले आहे परंतु निविदेला प्रतिसाद मिळणार नाही कारण निधीला स्थगिती आहे व स्थगिती केव्हा उठेल याचा भरवसा नाहीये. स्थगिती नाही उठली तर नागरीकांना आपण कायम आशेवर ठेवु का ? मी त्यावेळेला सुचना काय दिली होती साहेब की ते काम त्या निविदेमधुन तेवढे काम रद्द करा .आणि तेवढया कामाचं निधी आपल्याकडे उपलब्ध आहे . म्हणजे आज परिस्थिती अशी आहे की मनपामध्ये निधी शिल्लक आहे परंतु विकासकामं बंद आहेत. असं जगात कुठेचं घडत नाही की निधी आहे परंतु विकास कामं थांबलेली आहे. निधी नसल्यावर विकासकामं थांबलेली आहेत ते आपण समजु शकतो परंतु ही विपरीत परिस्थिती आहे.

**मा.सभापती :-** ४२ कोटींची जी स्थगिती आहे शासनाकडे स्थगिती उठवण्यासाठी आपण प्रयत्न करूया

**श्री. नितीन लढढा :-** ताई हा रस्ता. . .

**मा.सभापती :-** हा रस्ता जो आहे ना तो महत्वपुर्ण आहेच नितीनभाऊ तो वादाचा विषयच नाही . व ४२ कोटी मध्ये सगळीच कामे आहेत आपल्याला आधी स्थगिती उठवावी लागेल.

**श्री. नितीन लढढा :-** हा जो रस्ता आहे , काही गोष्टींची प्राथमिकता जी आहे ना त्यासाठी धोरणात्मक निर्णय या सभागृहाने घेणं गरजेचे आहे. कारण सरकार बदलल्याने सरकारच्या प्रायोरीटीज बदललेल्या आहेत. निधी जर आला तर सगळयांनाच आनंद

होईल.आम्हालाही आनंद होईल , आपल्यालाही आनंद होईल. परंतु सरकारची परिस्थिती काय आहे ती आपल्यालाही माहिती आहे. कारण आज राज्य शासनावरही कर्ज आहे , केंद्र शासनावरही कर्ज आहे. निधी मिळेल नाही मिळेल आणि त्या निधीमधुन आज आपण हे काम जर का नाही केलं निधी मंजुर झाला आहे तो एक वर्षानंतर आला किंवा दोन वर्षानंतर आला किंवा महिन्याभरानंतर आला महिन्याभरानंतर आला तर हे काम त्याच्यातुन करून टाकु . परंतु काय होईल की त्या निधीच्या भरवश्यावर राहीलो तर मी म्हणतो की साधारणत: ४ महिन्यानंतर पावसाळा सुरू होईल . ४ महिन्यानंतर त्या रस्त्याची ईतकी वाताहत होईल. की तिथे अक्षरशा चिखल होईल तर त्याची पर्यायी व्यवस्था आपण फक्त शासनाच्या निधीवर अवलंबुन राहुन चालणार नाही . निधी मिळाला तर सगळयांनाच आनंद होईल.परंतु नाही मिळाला तर जसे थोडया वेळा पुर्वी काय म्हणाले की ही निविदा प्रक्रीया का राबविली आपण एक निविदा राबवली कामगार आणि वाहन चालक घेण्याच्या संदर्भातील ती पर्यायी व्यवस्था होते . ती याच्यामध्ये आपण पर्यायी व्यवस्थेचा विचार करणार नाही का ? हे तेवढच गरजेच आहे.

**श्री.सुनिल भोळे , शहर अभियंता :-** टेंडर आले होते , साईड टेंडर आपण मागवलेले आहे .

**मा.आयुक्त सो :-** हा निधी आहे त्यावेळेला जी अर्थसंकल्पीय जी रक्कम आहे ना त्याच्या अगेन्स्ट दिलेले आहे त्याच्यामुळे अडचण आहे. आणि हया ४२ कोटीला अडचण येणार नाही त्यामुळे पुढे जे काही असेल जसे प्रशासकीय मान्यता असेल त्याला अडचण येवु शकेल.

**श्री. विष्णु भंगाळे :-** बरोबर आहे अडचण येणार नाही किंवा येईल परंतु त्याला पर्याय काय जर आज त्याला स्थगीती दिली आहे त्याच्यावर पर्याय काय आहे मग .

**मा.आयुक्त सो :-** फक्त एका गोष्टीवर अवलंबुन राहून चालणार नाही आपण सगळया रस्त्याचा विचार करू.

**श्री. नितीन लढढा :-** मी काय म्हणतो की सगळया रस्त्यांच्या बाबतीत आपल्याला पर्यायी व्यवस्था ठेवावी लागेल.आपण सकारात्मक विचार करतो की शासन निधी देईल परंतु नकारात्मक विचार करून आपण पर्यायी व्यवस्था केली पाहीजे.

**मा.आयुक्त सो :-** जर सगळयांनी प्रयत्न केले तर निश्चितच सकारात्मक होईल.

**श्री. राजेंद्र पाटील :-** सभापती महोदय, आयुक्त महोदय , मला वाटत आपण सर्वांनी अमृत योजनेच्या माध्यमातुन जी कामं चालली आहेत. पाईप लाईन व अंडरग्राऊंड ड्रेनेजची तर आपण त्याला जर का प्राधान्य दिलं आणि हे जर का आधी वेळेवर झ ाालं असतं तर कदाचित आपला जो निधी आहे हा निधी वापरला गेला असता . कारण नसतांना आपल्याला निधी अन्यत्र ईकडे तिकडे वापरावा लागला . मला वाटत आपलं सर्व प्रशासन असेल आणि आपले सर्व सन्मा.सदस्य असतील सर्वांनी मागे लागुन जसे आपण आरोग्यासाठी सर्वजण पाठपुरावा करतो तसचं आपण सर्वांनी अमृतचाही पाठपुरावा केला आणि याला प्राधान्य दिलं तर हा निधी रस्त्यावर खर्च करता येईल . यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करावे .

**श्री. विष्णु भंगाळे :-** आता भाऊ म्हणता आहेत तसं जर कधी हेच नियोजन सत्ताधारी गट आपला आहे , आम्ही एक विरोधक म्हणुन लोकांच्या नजरेत आलेले काम व आमच्या नजरेत पडलेले कार्य जे आहे ते आम्ही सभागृहाच्या समोर ठेवणेचा प्रयत्न करतो . त्या माध्यमातुन या जळगांव शहराच्या विकासात भर पडेल . सत्ताधारी गटातीलचं सदस्य त्याबाबतीत जास्त समस्या आपल्याकडे मांडताहेत.तुम्ही मागील काळापासुन बघा .

**श्री. सुनिल खडके :-** भाऊ तुम्ही . . .

**श्री. विष्णु भंगाळे :-** भाऊ मला बोलु द्या तुम्ही नंतर बोला .

**श्री. सुनिल खडके :-** भाऊ तुम्ही बोला . . .

**श्री. विष्णु भंगाळे :-** सत्ताधारी गटातील नगरसेवक म्हणतात आता हे कामं करून घेण्याची जबाबदारी कोणाची होती सत्ताधाऱ्यांची मग कशाला आपण त्याच्यावर पुन्हा पुन्हा बोलुन त्याच्यावर चर्चा करायची .

**श्री. राजेंद्र पाटील :-** भाऊ हे काम तुम्ही असतांना सुरू झालेले आहे. तुमची जण जबाबदारी होती.

**श्री. विष्णु भंगाळे :-** असं म्हणु नका कामं करून घ्यायचं असतं .

**श्री. राजेंद्र पाटील :-** आता अमृत ची जी योजना आहे ती आता आमच्या काळात सुरू झाली नाही ती आधीपासुन सुरू झाली आहे आणि तशात आपण पाठपुरावा केला असता

**श्री. विष्णु भंगाळे :-** तुम्ही त्यात बघा त्यात एक दिलेली पॉलीसी असते , तुम्ही ते खड्डे बुजविण्याची जी पॉलीसी असते किंवा त्या चाऱ्या दाबण्याचे नियोजन व निविदा या कधी केल्या याचापण विचार करा.

**श्री. राजेंद्र पाटील :-** ठिक आहे त्याला आपण प्राधान्य द्यावे .

**श्री. विष्णु भंगाळे :-** सभापती महोदय नितीन भाऊंनी जो मांडलेला विषय आहे. हा रामानंद नगररोडवरचा त्याचा एक विचार करावा हा विषय पलटवण्याचा विषय नाहीये किंवा दुसरीकडे नेण्याचा विषय नाहीये ही समस्या पुर्ण शहराची आहे.

**श्री. राजेंद्र पाटील :-** भाऊ विषय पलटवण्याचा नाहीये .

**श्री. विष्णु भंगाळे :-** सभापती महोदय आपल्याकडुन आम्हाला एकच आशा आहे की शहरातील कमीत कमी खड्डे बुजवले जातील. खड्डे बुजले जातील हा विषय मागील दोन तिन मिटींग पासुन सुरू आहे. तर याच्यावर निर्णय घेणे हे महत्वाचे आहे..

**श्री. राजेंद्र पाटील :-** खड्डयांच्या संबंधी मला बोलायचे आहे की मागच्या सभेत शिरसोली रोडला जो पुल तोडलेला आहे त्या विषयी आपली चर्चा झाली होती त्या दृष्टीकोनातुन आपण काही पावले टाकली किंवा नाही टाकली सुरूवात झालीये भाऊंनी सुचवले होते की महापालिकेच्या निधीतुन त्या पुलासाठी काही तरतूद करावी.

**श्री.सुनिल भोळे , शहर अभियंता :-** ढेकळे साहेबांना सांगीतले की ,कालच बैठकीमध्ये कार्यकारी अभियंता यांच्याशी चर्चा झ ाली व त्यांनी सांगीतले की ते आम्ही करून देवु व राहीला विषय तिथे असलेल्या खड्डयांचा तर तिथे आमची एक गाडी त्या ठिकाणी चालु आहे व तिथे खड्डे बुजवणे सुरू आहे.

**श्री. राजेंद्र पाटील :-** खड्डे बुजायला सुरूवात झाली आहे का ?

**श्री.सुनिल भोळे , शहर अभियंता :-** हो सुरू आहे.

**श्री. सदाशिव ढेकळे :-** त्या ठिकाणी खड्डे बुजविता येतात तर मग आपल्याला पुल करायला किती खर्च लागणार आहे. आपण खड्डे बुजता आहेत ऑलरेडी तिथे जो पुल आहे . एल . एस. पाटील या मक्तेदाराला आपण साईड पट्टया करायला मक्ता दिला आहे बी.एन्ड सी ने आणि आपण ते खड्डे बुजता आहेत तर आपण खड्डे बुजु शकतात का? मग ती छोटीशी मोरी बनवायला काय हरकत आहे.

**मा.सभापती :-** खड्डे बुजविणे हे वेगळे आहे.

**श्री. सदाशिव ढेकळे :-** नाही आपण ते काम जर ठरवलं . बि एन्ड सी चं काम असचं आहे दोन वर्षांनी होईल बि एन्ड सी कडुन आपण लवकर करू शकतो व व्यवस्थित होईल.

**मा.सभापती :-** भोळे साहेब दोन वर्ष लागतील का बि एन्ड सी च्या कामाला ? आपण जर लवकर करू शकतो तर आपण करा .

**श्री.सुनिल भोळे , शहर अभियंता :-** आम्ही ते करून देवु असे त्यांनी काल सांगीतले आहे.

**श्री. विष्णु भंगाळे :-** सभापती महोदय , ढेकळे साहेबांच्या बोलण्यावर मी बोलु ईच्छितो की बि एन्ड सी चे काम दोन वर्षांनी होतील . मग मागील दोन चार मिटींगा ज्यावेळेला सत्ता आपलीच होती त्यावेळेला निधी आला तेव्हा महापालिकेत महापौर आपला , उपमहापौर आपला सर्व काही आपले तर मग बि एन्ड सी कडे कामं का देतात आपण हा विषय मी मांडत होतो त्याला तुम्ही मंजुरी दिली मग आपण तरी बि एन्ड सी वरच येताहेत . हे काय चाललय हो .

**मा.सभापती :-** विष्णू भाऊ आचार संहितेचे उल्लंघन करू नका ही आपल्याला नम्र सुचना आहे सभा सुरू होण्याच्या आधीच सांगीतले होते की आपण चर्चा करायची आहे आपण आदर्श आचार संहितेचे उल्लंघन होईल अशी चर्चा कुठेच भरकटवायची नाहीये . बोला मॅडम सन्मा.सदस्यांना बोलायचे आहे तुम्ही बोला.

**शेख सैईदा युसुफ :-** हमारे प्रभाग क्रं.१८ मे दो ढापे टुटे हुए है , हमारे घरपर तक्रार आ रही है.

**मा.सभापती :-** त्यांच्या प्रभागात ढापे तुटलेले आहेत त्यांची तक्रार आलेली आहे आपल्याकडे.

**श्री.सुनिल भोळे , शहर अभियंता :-** ठिक आहे चेक करून घेतो .

**मा.सभापती :-** यांच्या तक्रारीची दखल घेण्यात यावी व त्याच्याबद्दल काय उपाययोजना केल्यात याची सन्मा.सदस्यांना कळविण्यात यावे.

**शेख सैईदा युसुफ :-** वॉर्ड मे के बच्चो को लगा था.

**श्री.नितीन लढढा :-** त्याच पध्दतीने शाहु नगर कॉम्पलेक्स पासुन ते ख्वॉंजामिया रस्ता डिव्हायडर टाकुन झालेले आहेत ख्वॉंजामिया चौकात अशी परिस्थिती आहे की ती कबर रस्त्यामध्ये आहे. डिव्हायडर टाकले गेलेले आहेत रस्त्यांची अवस्था अत्यंत वाईट आहे. अत्यंत प्रमाणात दुर्दशा त्या रस्त्याची झालेली आहे. ज्या पध्दतीची परिस्थिती आहे त्यापेक्षा जास्त ती यांची आहे .आज असे बघितले तर मा.महापौर ताई यांचा तो प्रभाग आहे एक साधारण अपेक्षा असते जे पदाधिकारी असतात त्यांचे प्रभाग तरी निवडलेले असतात परंतु त्याची परिस्थिती अत्यंत वाईट आहे. तर मला ख्वॉजामिया चा हा रोड आणि रामानंद नगरचा रस्ता प्रशासनाने कुठेतरी खात्री द्यावी की आम्ही किती दिवसांत त्याला पुर्ववत करू. निदान तिन मिटरच्या रस्त्याचे संदर्भात भोळे साहेब सांगत असतील .

**मा.सभापती :-** भोळे साहेब तरी साधारण किती वेळ लागेल.

**श्री.सुनिल भोळे , शहर अभियंता :-** मॅडम तो ४२ फुटी आहे.

**मा.सभापती :-** ४२ फुटी आहे बरोबर आहे पण आपण तिथे मुरूम टाकुन करा कारण तिथे गाडी अडकते आहे व दणका बसतो आहे त्याचे तेवढे तर आपण करू शकतोय.

**श्री.सुनिल भोळे , शहर अभियंता :-** ठिक आहे मॅडम करतो.

**श्री.नितीन लढढा :-** सभापती महोदय त्या रस्त्यावर मोठमोठे खडे वर आलेले आहेत . म्हणजे त्या खडयांचा धोका काय आहे की एखादा मोटरसायकल वाला स्लीप होवुन अपघात होवु शकतो किंवा एखादया चारचाकीच्या टायराखाली खडा आल्यानंतर तो उडुन एखादयाचा डोळा फुटु शकतो. अशी परिस्थिती तिथे सातत्याने निर्माण होत असते.

**मा.सभापती :-** जर अश्या प्रकारे जर शहराच नुकसान होत आहे व गाडीवरून पडल्यावर जखमा होत आहेत व हे सतत होते आहे तर आपण याच्यावर मुरूम टाकुन जिथे ते खडे वर आलेले आहेत ते आपण लवकर करू शकतो व ते प्रशासनाने ताबडतोब करावे.

**श्री.नितीन लढढा :-** आता ताई सकाळी एक बातमी वृत्तपत्रात वाचली आणि त्याचं कुणीही गांभीर्य घेत नाहीये ती मनपाच्या खुल्या जागेवर ५ दुकांनाच्या संदर्भातील बातमी आहे आता ५ दुकाने यांच काय मिळकत कधीपासुन बांधलेली आहे . मिळकत मनपाची आहे मनपाच्या मिळकतीचं रक्षण करणं ही जबाबदारी प्रशासकीय व्यवस्थे मध्ये ज्या कोणावर दिलेली असेल त्यांची ती जबाबदारी आहे. याच पध्दतीने मागेही बोललेलो होतो की ज्या पध्दतीने मेहरूण मधील आपले जे घरकुल आहे. त्या घरकुलच्या जागेचा भुसंपादनाचा मोबदला देवुन साधारणत: बरीच वर्षे झालेली आहेत. ही कमीत कमी आठव्यांदा की दहाव्यांदा

या सभागृहात चर्चा करतोय की त्या जागा मालकाच्या ताब्यामध्ये अजुनही तो जागा वापरत आहे आणि त्याचा तो व्यवसायिक वापर करतो आहे. परंतु वारंवार सुचना देवुनही या सुचनेकडे दुर्लक्ष का होतयं. या ५ दुकांनाच्या बाबतीतला प्रकार काय आहे ? कोण ते वापरतो आहे , कोण त्यांच्या भाडयाचे उत्पन्न घेतोय प्रशासनाने काही माहिती घेतली का याच्या संदर्भात आणि प्रशासनाने माहिती घेतली असेल तर कमीत कमी आपल्याला नजरेत आणावे की कोण संबंधित व्यक्ती आहे. आणि कोण अश्या पध्दतीने मनपाच्या मिळकतीमधुन उत्पन्न कमवतो आहे. अश्या किती मिळकती असतील मनपाच्या की ज्याचा व्यवसायिक वापर होत असेल. आज वृत्तपत्रामध्ये आहे की एक खुली जागा १७ हजार स्के. फुटची आहे त्याच्यावर भाडे कमवले जाते आहे.

**मा.सभापती :-** नगररचना सहाय्यक , गट नं.८०/२ भाऊ ज्याचे म्हणताहेत की जो ओपन प्लॉट आहे महापालिकेची ओपन स्पेस आहे. आणि तिथे साधारण १८५०० पावेतोची ही जागा आहे आणि तिथे ५ दुकाने आहेत. ८ बाय १० चे पाच दुकानं आहेत . अनधिकृतपणे उभारलेली आहेत आणि त्याचा वापर होतोय . माझ्या निदर्शनास आल्यानंतर मी संबंधित विभागाला सुचना देण्यात येते की पुढील सभेपावेतो याचा अहवाल सादर करावा.

**श्री.नितीन लढढा :-** म्हणजे कोणाला अशी खबर घ्यावीशी वाटली नाही की, ही मनपाची जागा आहे आणि ओपनस्पेस आहे आणि कोणी असे अनधिकृतरित्या बांधकाम केलेले आहे आणि तेही व्यावसायीक बांधकाम केलेले आहे.

**श्री.ईस्माईल शेख,सहा.नगररचनाकार :-** समीर बोरोले यांना हा विषय माहित आहे.

**मा.सभापती :-** माझ्या माहिती प्रमाणे ही जागा नगरपालिका असताना शैव गुरव समाजाला दिलेली होती. परंतू त्या समाजाने तेथे कोणतेही काम केलेले नाही व मला वाटते या ज्या दुकानांचे बांधकाम झालेले आहे त्याचेशी ही त्यांचा काहीएक संबंध असणार नाही. आणि मंध्यतरी आपण ज्या नोटीसा दिलेल्या होत्या ज्या समाजाला म्हणा संस्थांना आपण ज्या ज्या कारणांसाठी जागा दिलेल्या होत्या त्या कारणांसाठी त्यांचा वापर होत नसेल तर त्या संदर्भात नोटीसा होत्या तसेच याठिकाणी दुकानांचे बांधकाम झालेले आहे हे कोणाच्याही कसे लक्षात आले नाही हा आश्चर्याचा विषय आहे. कालच हा विषय माझ्या लक्षात आलेला आहे आणि याच्या बाबतीत सूचना दिलेल्या होत्या.

**श्री.नितीन लढढा :-** भोईटे नगर उड्डाण पूला संदर्भात काही अहवाल आला आहे कां ?

**मा.सभापती :-** त्यांनी साईट व्हिजिट केलेली आहे आमची डिआरएम साहेबांशी मिटींग झाली होती खा.उन्मेशदादा यांचे मदतीने यांचे सोबत मिटींग झाली होती. त्यात त्यांनी सगळे पॉझीटीव्ह दिलेलं आहे. त्यानंतर त्यांचे अधिकारी बोलुन गेले आणि ब्राम्हण सभेचा जो बोगदा आहे तर त्याच्या बद्दल ते आपल्याला ईस्टीमेट देताहेत प्रॅक्टीकली त्यांनी तिथे स्पॉट व्हेरिफीकेशन केल्यानंतर हे तिथे होवु शकतं याला त्यांनी प्राथमिक मान्यता दिलेली आहे.त्याचे डिझाईन आणि ईस्टीमेट ते आपल्याला लवकरात लवकर देणार .

**श्री.नितीन लढढा :-** पिप्रांळा साठी . .

**मा.सभापती :-** पिंप्राळयाच्या आर्म साठी आम्ही तिथे स्पॉटवर गेल्यानंतर तिथे अश्या पध्दतीने आर्म बसु शकतो याच्यावर रिझल्ट सुध्दा त्यांच्याकडुन येणार आहे व कमीत कमी भुसंपादन आपल्याला करावं लागेल कारण जे एक्झटींग आहे की जिथे नागरीक राहता आहेत. त्यांना ही त्रास न होता कोणत्या पध्दतीने आर्म आपण तिथे बसवु शकतो याच्यावर आपल्या काही सुचना होत्या की त्याच्यावर त्यांनी टेक्नीकली डिझाईनिंग करून व ते कन्सल्ट करून आपल्याला डिझाईन पाठवित आहेत.

**श्री.विष्णू भंगाळे** :- सभापती महोदय , मागील दोन तीन मिटींग मध्ये सुध्दा मी एलईडी लाईट आपल्या सभागृहात लक्ष वेधलं होतं की शहरामधील की ज्या दिवशी आग लागली होती पोलन पेठमध्ये त्या रोडवर आजसुध्दा लाईट बंद आहेत. तसेच गांधी नगर मधील भिरूड हॉस्पीटल ची गल्ली पुर्णपणे बंद आहे. त्या एलईडी लाईटांच्या बाबतीत आजपर्यंत काय घटना घडल्या व त्याबाबतीतला निर्णय आजपावेतो का होवु शकला नाहीये. त्यावेळेस मी हा प्रश्न विचारला होता सभागृहामध्ये तेव्हा सांगीतले होते की बस ती लाईन लावलेली आहे दोन तिन दिवसांत लागुन जातील त्याला विस पंचविस दिवस झालेत तरी आयुक्त साहेब याच्यावर मला , म्हणजे जळगांव शहराचा प्रश्न आहे तो खरा परंतु एक निदर्शनास येतं वॉर्डातील , प्रभागातील कंम्पलेंटीं आमच्या पर्यंत येतात त्यावेळेस असं वाटतं की हे लाईटस कायमस्वरूपी बंद का आहेत लाईटचं चालु नाहीयेत साहेब .

**मा.सभापती :-** सांळुखेसाहेब सांगा.

**श्री.सुशिल सांळुखे :-** ईएसएसएल कंपनीमार्फत आपण एस्क्रोचे कामं आपण चालु केलेले होते नंतर आपण त्याला नोटीस दिल्यानंतर त्याने काम बंद केलेले होते .प्रशासकीय पातळीवर बऱ्याच चर्चा झाल्यानंतर त्यांनी हे मान्य केलं की हया चुका आमच्याकडुन झाल्या आहेत.आम्ही मॉडीफाय करून कामं सुरू करू. त्यानंतर सर्वेक्षणाचे कामं सुरू झाले पण काही प्रॉब्लेम आल्यानंतर ते काम बंद पडले आहे. आता सर्वेक्षणाचे काम चांगल्या पध्दतीने सुरू असुन ६ हजार पथदिव्यांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे. बाकी पथदिव्यांचे काम येत्या आठवडयात पुर्ण होईल . १९ तारखेपासुन मेंन्टेनन्स करू असा त्यांनी शब्द दिलेला आहे. आणि हे एलईडी असल्याने आपल्याकडे एलईडी नसल्यामुळे ते बंद आहेत व ते त्यांच्याकडुनच बदलावे लागतील कारण आपल्याकडे फक्त फीक्चरर्स आहे आणि तिथे जुनी लाईन असल्यामुळे तिथे मेनरोड वर फीक्चर लावण्यात आलेले आहेत.

**मा.सभापती :-** जेवढया लाईटांचे सर्वेक्षण झाले आहे तेवढे आपण लावु शकत नाहीत का .

**श्री.सुशिल सांळुखे :-** नाही मॅडम करू शकत नाही कारण आपण जर काम सुरू करू तर मागच्या वेळेसारखी परिस्थिती निर्माण होणार आहे , कारण त्यांनी एका भागात काम पुर्ण केलेले नाहीये काही भागात २० टक्के काही भागात १० टक्के तर काही

भागात सुरूवातही केलेली नाहीये. त्यामुळे पुर्ण नियोजन न करता जर कामं केले तर परत मागच्या सारखी परिस्थिती निर्माण होवु शकते .

**मा.सभापती :-** ते कामं केव्हा पुर्ण होणार आहे ?

**श्री.सुशिल सांळुखे :-** १९ तारखेपावेतो पुर्ण होईल.

**मा.सभापती :-** १९ जानेवारी पावेतो . . .

**श्री.सुशिल सांळुखे :-** होय त्यांनी आधी डिपीआर संपवु व कामाला सुरूवात करू असा त्यांनी शब्द दिलेला आहे.

**मा.सभापती :-** म्हणजे १९ जानेवारी पासुन कामाला सुरूवात होणार .

**श्री.सुशिल सांळुखे :-** होय म्हणजे १९ तारेखेपर्यंत डिपीआर संपवु व कामाला सूरवात करू असा शब्द दिलेला आहे. त्यानुसार मटेरियलची तयारी करतो असेही सांगीतले आहे.

**मा.सभापती :-** त्यानुसार त्या स्पीडने डिपीआरचे काम सुरू आहे का ?

**श्री.सुशिल सांळुखे :-** होय डिपीआरचे कामं व्यवस्थित सुरू आहे.

**मा.सभापती :-** १९ तारखेपासुन काम सुरू होईल अशी अपेक्षा आहे.

**श्री.सुशिल सांळुखे :-** होय अपेक्षित आहे.

**श्री.विष्णू भंगाळे :-** सभापती महोदय , मी याच्यावर विश्वास करतो पण आपण पोलन पेठला नविन एलईडी लावले होते का ?

**श्री.सुशिल सांळुखे :-** त्यांनी ७ ते ८ हजार जे लावलेले आहे. . .

**श्री.विष्णू भंगाळे :-** नाही नाही नविन लावले होते का .

**श्री.सुशिल सांळुखे :-** म्हणजे त्यांच्या स्किम चे का ?

**श्री.विष्णू भंगाळे :-** त्यांच्या स्किम चे लावले होते का ?

**श्री.सुशिल सांळुखे :-** त्यांनी अजुन कामचं सुरू केलेले नाही तर बदलवतील केव्हा भाऊ फक्त डिपीआरचेच काम सुरू आहे हेच सांगतो आहे मी आपल्याला .

**श्री.विष्णू भंगाळे :-** नविन लावलेले एलईडी सुध्दा बंद पडताहेत काय हिशोब आहे हा .

**श्री.सुशिल सांळुखे :-** हि त्या कंपनीची जबाबदारी आहे आपण जर तिथे हात लावुन जर काही केले तर आपल्यावर दोष येवु शकतो आपण फक्त काय करू शकतो की त्याला जर कार्बन असेल तर तो काढुन चालु करण्याचा प्रयत्न करणे.

**मा.आयुक्त सो :-** साधारण त्यात ७० व्हॅट चे आहेत.

**श्री.सुशिल सांळुखे :-** हो साहेब ७० व्हॅटचे आहेत लावलेले सगळे त्याच्याबद्दल कंपनीने लेखी मान्य केलेले आहे.

**श्री.विष्णू भंगाळे :-** सभापती महोदय , लवकरात लवकर करावे , तसा एक विषय आहे मोकाट कुत्र्यांचा जळगांव शहरात खुप प्रमाणात मोकाट कुत्रे झालेले आहेत. रस्त्यामध्ये मोटारसायकल धारक असतील किंवा चालणाऱ्याला रस्त्यावर खुप मोठया प्रमाणात त्रास होतोय याबाबतीचं नियोजन काय आहे.

**डॉ.विकास पाटील, आरोग्याधिकारी :-** आपण त्यांच्यावर निर्बिजीकरण करून त्यांना त्याठिकाणी सोडण्याची प्रक्रीया चालु केलेली आहे.

**श्री.प्रविण कोल्हे :-** करतात पण तुम्ही पाहीले आहे का ?

**डॉ.विकास पाटील , आरोग्याधिकारी :-** होय चालु केलेले आहे.

**श्री.विष्णू भंगाळे :-** सुपरव्हिजन कोण करत आहे ?

**डॉ.विकास पाटील , आरोग्याधिकारी :-** त्या त्या भागातील एस .आय करत आहे.

**श्री.विष्णू भंगाळे :-** आपल्याकडे काही टेक्निकल काही प्रुफ आहेत का ? काही त्याचे फोटो वगैरे काहीतरी घ्या. आपण हे केव्हा पाहीले .

**डॉ.विकास पाटील , आरोग्याधिकारी :-** आपण फोटो घेतोय व फोटो घेवुनच काम करतोय आपण.

**श्री.विष्णू भंगाळे :-** कुठे करताहेत ते.

**डॉ.विकास पाटील , आरोग्याधिकारी :-** टि बी एस हॉस्पीटल मध्ये काम सुरू आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आतापर्यंत आपल्याकडे किती फोटो संग्रहीत आहेत .

**डॉ.विकास पाटील , आरोग्याधिकारी :-** आपल्याकडे ६०० फोटो आहेत .

**श्री.नितीन लढ्ढा :-** ६०० फोटो आहेत . त्यांची पडताळणी कोण करणार ?

**डॉ.विकास पाटील , आरोग्याधिकारी :-** आपण ज्यांचे काम करतो त्यांचे स्पॉटचा नकाशा नुसार फोटो घेतो.

**श्री.नितीन लढ्ढा :-**समजा त्याने एका ह्याच्या वेगवेगळया कॉपीस काढुन तुमच्याकडे पाठवुन दिल्या तर मग काय कराल?

**डॉ.विकास पाटील , आरोग्याधिकारी :-** नाही आपल्याकडे तो प्रत्येकाचे ॲक्च्युअल फोटो काढुन देतो . म्हणजे आपल्याकडे जी गाडी आहे .

**श्री.नितीन लढ्ढा :-** निर्बिजीकरण कुठे करतो आपण ?

**डॉ.विकास पाटील , आरोग्याधिकारी :-** टि.बी.एस हॉस्पीटल मध्ये करतो .

**श्री.नितीन लढ्ढा :-** टि.बी.एस हॉस्पीटल मध्ये करतो पण आपला कर्मचारी कोणी तिथे नोंदणी करतो का आपला कर्मचारी

**मा.सभापती :-** कोण करतय कोण कर्मचारी करत आहेत.

**श्री.नितीन लढ्ढा :-** कोण कर्मचारी नोंदणी करतोय ?

**डॉ.विकास पाटील , आरोग्याधिकारी :-** नाही ते काम कन्ट्युन्यु चालु आहे.

**श्री.विष्णू भंगाळे :-** नाही मग व्हिडीओ शुटींगच करावी त्याची आता खरच गरज आहे .आता खुप झाले हे आयुक्त साहेब

**श्री.नितीन लढ्ढा :-** आपण हे पुर्वीही राबविले होते परंतु काय होते याच्यामध्ये पडताळणी करण्याच्या संदर्भातील कुठलीच व्यवस्था नाहीये. मागच्या एका मक्तेदाराने काम केले होते . आम्ही त्याचे बिल थांबविलेले होते. कारण काय आहे की याची खात्री कोण पटवुन देईल .

**डॉ.विकास पाटील , आरोग्याधिकारी :-** नाही आपण टॅगींग करतोय.

**श्री.नितीन लढ्ढा :-** त्याला काही टॅगींग केले असेल , आता समजा त्याने टॅगींग करून सोडुन दिले असेल कोण खात्री करणार की त्याचं निर्बिजीकरण झालय की नाही. नुसती टॅगींग करून फायदा नाहीना .

**श्री.सदाशिव ढेकळे :-** जिथे काम चालु आहे तिथे सदस्यांना आमंत्रित करा , सदस्यांना बोलवा दाखवा की हे काम हया ठिकाणी होतय , येथुन आणता आहेत.

**डॉ.विकास पाटील , आरोग्याधिकारी :-** मागच्या आठवडयामध्ये आपले जे इंजिनियर आहेत संजीव पाटील त्यांनी पाहीले आहे की ऑपरेशन चालु होते व मी सोबत होतो .

**श्री.नितीन लढ्ढा :-** अहो पाटील साहेब ते मी तेच म्हणतोय की समजा १० दररोज पाठवत असेल.

**डॉ.विकास पाटील , आरोग्याधिकारी :-** नाही भाऊ तसे नाहीये .

**मा.सभापती :-** याच्या नोंदणी करीता आपण कोणी नेमलं आहे का .

**डॉ.विकास पाटील , आरोग्याधिकारी :-** आपण कोणालाही नेमलेल नाही . आणि बिडसने रेकॉर्ड मेंटेंन केले आहे. रॅबिट व्हक्सीनचे पण रेकॉर्ड मेंटेंन केलेले आहे आणि कुत्र्यांचे निबिर्जीकरण झाल्यानंतर . . .

**मा.सभापती :-** ते संपुर्ण रेकॉर्ड सभागृहाला दाखवण्यात यावे .पुढच्या होणाऱ्या मिटींग मध्ये आणावे.

**मा.आयुक्त सो :-** मागे आपली चर्चा झाली होती की कुठलीही एजन्सी येत नाहीये सहाव्यांदा टेंडर निघाल्यावर आता ती एजन्सी आली आणि त्यांनी काम सुरू केले. त्या एजन्सीच्या ही काही तक्रारी आहेत. अमरावतीचे आहेत ते जे काही कामं केले आहे त्याचे पेमेंट केलेल नाहीये व तो आता परवा आला होता व म्हणाला की मी आता हे थांबवतोय म्हणजे काम करूनही आपल्याला प्रॉब्लेम येतोय तर त्याच्यामध्ये मॉनीटरीं व्यवस्थित करा आणि तरी सर्व सदस्यांनी त्याठिकाणी जसे आता हे म्हणताहेत की काम चालु आहे तिथे सरप्राईज व्हिजीट जर का आपलं शक्य झालं तर जाता येता तर आपणही बघुन घ्या. त्याला दुसरा पर्याय नाहीये.

**मा.सभापती :-** आपण आपल्या पध्दतीने चेक करावे.

**श्री.विष्णू भंगाळे :-** नाही साहेब त्याची जर व्हिडीओ शुटींगच केली तर काय हरकत आहे.

**मा.आयुक्त सो :-** नाही व्हिडीओ शुटींगलाच आपल्याला खर्च येईल.

**श्री.विष्णू भंगाळे :-** नाही साहेब पण हे काम न करताच ते काम दाखवले जाते आहे किंवा होतच नाहीये तर त्याच्यावर तरी कमीत कमी बंधन येईल . आणि जळगांव शहराची सुटका होईल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आता काय झालंय की महापालिकेमध्ये ज्या पध्दतीने अधिकारी आणि कर्मचारी सेवानिवृत्त होताहेत आणि त्याचे अतिरीक्त पदे दुसऱ्याकडे सापविले जाताहेत. आम्ही गटारीची काढण्याची समस्या , रस्त्यांची समस्या , पाण्याची समस्या मांडता मांडता आयुक्तांनी एक सांगावे की तुम्ही त्या ठिकाणी जावुन खात्री करा एक एक जण खात्री करत चला आणि बघत चला व निर्बिजीकरण पध्दतीने होतय की नाही .

**श्री.सदाशिव ढेकळे :-** आरोग्याधिकारी साहेब कुठलं ठिकाण आहे तिथं ऑपरेशन होते विष्णू भाऊंना बोलवा , नितीन भाऊंना बोलवा दाखवा ना ते कुठे आहे .

**श्री.विष्णू भंगाळे :-** ढेकळे साहेबांचे ऑफीस तिथे शेजारीचं आहे पण एकदाही त्यांना करतांना दिसले का की कुत्रे उचलेले हे तरी कोणाच्या तरी लक्षात येते ना . कुत्रे उचलले तर ते तरी निदर्शनास येते .

**श्री.सदाशिव ढेकळे :-** भाऊ आता त्यांनी आमंत्रित केले आहे . तिथे जा बघा .

**श्री.विष्णू भंगाळे :-** ढेकळे साहेब आणि मी येणार नक्की त्याची शहानिशा करणार तुम्ही करा व आम्ही येवु काही हरकत नाही , जळगांव शहराच्या भल्यासाठी ऐवढे करूच.

**मा.आयुक्त सो :-** हे महत्वाचे काम आहे त्याचे रेकॉर्ड व्यवस्थित ठेवा आणि ही तुमची जबाबदारी राहील आणि यात जर वैयक्तीक काही झालं आणि तुम्ही खालच्या लोकांना एक जबाबदारी द्या आणि जर न करताच जर पेमेंट केलं गेलं तर निश्चितपणे कार्यवाही होईल.

**श्री.विष्णू भंगाळे :-** याच्यात मला असं वाटत जर एखाद्या ऑपरेशन झालेल्या कुत्र्याचे जर एखाद्या अधिकाऱ्यासमोर ती झालेली आहे का याचा एक अहवाल रॅन्डमली एक कोणते तरी एक कुत्र उचलुन आणावं टॅग लावलेल्या पैकी आणि ते सिध्द करून दयावे त्यांनी म्हणजे ते आम्ही ते मान्य करू.

**डॉ.विकास पाटील , आरोग्याधिकारी :-** ठिक आहे करून टाकु .

**श्री.सदाशिव ढेकळे :-** आपण जे ठरवतो सभापती महोदय , आयुक्त साहेब त्याची अंमलबजावणी थोडी लवकर झाली पाहीजे आणि आपण मागे असे ठरविले होते की गिरणा पंपींग ची जी मशिनरी आहे त्याचा लिलाव करायचा आहे तर त्याची प्रोसीजर अजुन पर्यंत नाही बरेच महिने झाले मला वाटतं आता तिथे पोझीशन अशी आहे मी पंपीग वर गेलो होतो तिथे कोणी नाहीये .

आता जे काही असेल त्याची चोरी होईल आणि ती लिलावाची प्रोसीजर मी त्याचा दोन तिन वेळा त्याचा पाठपुरावा केला पण त्याची काही खात्री होत नाहीये .

**श्री.सुनिल भोळे, मशिनरी विभाग :-** आपण ते जि.प कडे पाठविले होते व आपण आता शासकीय अभिकर्त्याची नेमणुक करणेकामी शासकीय अभिकर्ता नियुक्त करणेकामी कळविलेले आहे .

**मा.आयुक्त सो़ा :-** कधी पर्यंत होणार तुम्हाला माहिती असतांना तुम्ही पत्र दिले हरकत नाही बर आता तुम्ही किती तारखेपर्यंत करून देणार

**श्री.सुनिल भोळे, मशिनरी विभाग :-** त्याला बेसीक व्हॅल्यु ही अभिकर्ता च ठरवेल साहेब आपण ती ठरविणे शक्य नाही.

**मा.आयुक्त सो़ा :-** भोळे मला हे माहित आहे तुमच्या कडे प्रत्येक प्रश्नाच उत्तर आहे. तुम्ही आता हे सांगा की आम्ही हे हया तारखेपर्यंत करू हे मला सांगा .

**श्री.नितीन लढ्ढा :-** त्याचा ठराव केलेला आहे आपण

**श्री.सुनिल भोळे, मशिनरी विभाग :-** हो ठराव पण केलेला आहे. त्याची प्रत्येक याची ही केलेली आहे.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** काय आहे तिथे चोरी झाल्यानंतर शेवटी काही शिल्लक राहणार नाहीये .

**श्री.सुनिल भोळे, मशिनरी विभाग :-** हया महिन्यामध्ये मी करून घेतो साहेब . टेंडर प्रोसीजर तयार करतो .

**श्री.सदाशिव ढेकळे :-** दुसरा विषय मानधन मिळालेले नाहीये साहेब आठ आठ दहा दहा वर्षे झालेले आहेत बऱ्याच वेळा सांगीतले होते , नितीन भाऊ बरडे यांनी ही सांगीतले होते व मला असे समजले की जो बोलतो त्याचे मानधन काढले जाते.

**मा.आयुक्त सो़ा :-** मग आज तुम्ही बोलले तुमचेही काढुन टाकु . मानधन सर्वच काढलेले आहे ते आपल्या अकाऊंट मध्ये जमा होईल.

**मा.सभापती:-** सभा संपलेली असल्याने नगरसचिव यांनी राष्ट्रगीत सुरु करावे.
राष्ट्रगीत झाल्यानंतर सभा संपन्न झाली.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**